cmyk

## संपादकीय

### अमिष देण्याचा सत्ताधाऱ्यांचा घातक प्रयत्न!

कोणत्याही निवडणुकीमध्ये सर्व पक्ष जे निवडणूकविषयक जाहीरनामे प्रसिद्ध करतात ते पूर्ण करण्यासाठी नसतात असा एक गर्भित अर्थ नेहमीच्या जाहीरनाम्यांच्या प्रसिद्धीमागे असतो. प्रत्येक निवडणुकीमध्ये तीच तीच आश्वासने देणारा सारख्याच प्रकारचा जाहीरनामा जाहीर का केला जातो हा संशोधनाचा विषय ठरू शकतो.

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com    नवी दिशा... नवे विचार.....    email:rajyaloktantra75@gmail.com

● पुणे ● अहिल्यानगर ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२१२ | शनिवार दि.२९ नोव्हेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### पतंजली तुपाचे नमुने तपासणीत नापास

पिथौरागढ : उत्तराखंड आणि उत्तर प्रदेशमध्ये पतंजलीच्या गाईच्या तुपाची तपासणी करण्यात आली, ज्यात नमुने मानकांवर खरे उतरले नाहीत. उत्तराखंडच्या पिथौरागढ न्यायालयाने उत्पादक कंपनीसह तीन व्यावसायिकांना १ लाख ४० हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. ही कारवाई अन्न सुरक्षा विभागाने दाखल केलेल्या खटल्याच्या सुनावणीनंतर करण्यात आली आहे.अन्न सुरक्षा आणि औषध प्रशासन, पिथौरागढचे सहाय्यक आयुक्त आरके शर्मा यांनी सांगितले की, तूप खाण्यायोग्य राहिलेले नाही. जर कोणी हे तूप खाल्ले तर त्याचे दुष्परिणाम होऊ शकतात. लोक आजारी पडण्याची शक्यता आहे.

### कोकणात ठाकरेंच्या भास्कर जाधवांचे बंड

रत्नागिरी : रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण नगरपालिकेची निवडणूक जवळ येत असताना शिवसेना ठाकरे गटात अचानक मोठा राजकीय कल्लोळ निर्माण झाला आहे. ठाकरे गटाचे आमदार भास्कर जाधव यांनी पक्षाच्या अधिकृत उमेदवारांचा प्रचार न करता थेट राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे उमेदवारांचा प्रचार सुरू आहे.चिपळूणमधील या वादाचे मूळ काही महिन्यांपासून सुरू असलेल्या संघटनात्मक मतभेदांमध्ये असल्याचे स्थानिक कार्यकर्त्यांचे मत आहे. खासदार विनायक राऊत आणि भास्कर जाधव यांच्यातील वाद अनेक वेळा सार्वजनिकरीत्या दिसून आला आहे.

### भारतीय सेनेने युध्दासाठी सज्ज असावे

नवी दिल्ली : चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ जनरल अनिल चौहान म्हणाले की, युद्ध स्वत:ला सतत बदलत आणि घडवत असते. ज्या संकल्पना भविष्यातील वाटतात, त्या लागू होण्यापूर्वीच जुन्याही होऊ शकतात. हा एक असा धोका आहे जो सैन्याला पत्करावा लागतो. त्यामुळे, भविष्यातील युद्धाच्या पद्धतीनुसार अंदाज लावणे, तयारी करणे हे आपल्या अस्तित्वाशी जोडले जाते. याला दुसरा कोणताही पर्याय नाही.सीडीएस चौहान यांनी गुरुवारी नवी दिल्लीतील सॅम मॉनेकशॉ सेंटरमध्ये सुरू असलेल्या चाणक्य डिफेन्स डायलॉगमध्ये हे विचार मांडले. ते फ्युचर वॉर्स: मिलिटरी पॉवरच्या माध्यमातून स्ट्रॅटेजिक पोस्चरिंग या विषयावर बोलत होते.

### हाँगकाँग अग्निकांडात १२८ जणांचा मृत्यू

हाँगकाँग: हाँगकाँगच्या बहुमजली इमारतींना लागलेल्या भीषण आगीत आतापर्यंत १२८ जणांचा मृत्यू झाला आहे. हाँगकाँगमधील जवळपास आठ दशकांतील ही सर्वात भीषण आग असल्याचं सांगितलं जात आहे. ताई पो येथील वांग फुक कोर्ट निवासी संकुलात ही आग लागली होती. बुधवारी लागलेल्या आगीत बांबूच्या तात्पुरत्या बांधकामावर आधारित असलेल्या ३२ मजली आठ इमारती वेढल्या गेल्या. ढिगाऱ्यातून आणखी मृतदेह बाहेर काढण्यात येत असल्यामुळे मृतांचा आकडा वाढण्याची भीती आहे. १९४८ नंतरची हाँगकाँगमधील सर्वात घातक घटना ठरली आहे. १९४८ मध्ये एका गोदामाला लागलेल्या आगीत १७६ लोकांचा मृत्यू झाला होता.

### रतन टाटांचा आलिशान बंगला विक्रीला

मुंबई: दिवंगत उद्योगपती रतन टाटा यांच्या मालकीचा एक प्रशस्त, आलिशान व्हिला विकला जाणार आहे. सेशेल्समधील सर्वात मोठं बेट असलेल्या माहेच्या समुद्र किनाऱ्यावर असलेला व्हिला विकण्यात येणार आहे. एअरसेलचे संस्थापक सी. शिवशंकरन कुटुंबानं हा व्हिला खरेदी करण्यात रस दाखवला आहे. त्यासाठी ६.२ मिलियन डॉलर मोजण्याची त्यांची तयारी आहे. भारतीय चलनात हा आकडा जवळपास ५५ कोटी रुपयांच्या घरात जातो. विशेष म्हणजे या व्हिलाचं अंदाजित बाजारमूल्य केवळ ८५ लाख रुपयांच्या घरात जातं.विशेष म्हणजे शिवशंकरन यांनीच रतन टाटा यांना हा व्हिला खरेदी करण्यास मदत केली होती.

### भारताच्या अर्थव्यवस्थेची ऐतिहासिक घोडदौड

नवी दिल्ली: भारताची अर्थव्यवस्था चालू आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीत (ऑक्टोबर ते डिसेंबर २०२५) जोरदार वाढली आहे. या तिमाहीत भारताची 'रियल जीडीपी ८.२% दराने वाढली आहे. गेल्या वर्षी याच तिमाहीत (ऑक्टोबर ते डिसेंबर २०२४) ही वाढ ५.६% होती. यावरून भारत च्या आर्थिक प्रगतीत मोठी झेप घेतल्याचे दिसते. या वाढीमुळे भारत जगातली सर्वात वेगाने वाढणारी मोठी अर्थव्यवस्था बनली आहे. 'नॉमिनल जीडीपी' मध्येही ८.७% ची वाढ नोंदवली गेली आहे.सरकारी आकडेवारीनुसार, ही वाढ प्रामुख्याने द्वितीय आणि तिसऱ्या क्षेत्रांच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे झाली आहे.

# कडधान्य अभियानाला राज्य सरकारची मान्यता!

## राज्यातील ३४ जिल्ह्यांमध्ये राबविले जाणार अभियान

पुणे । प्रतिनिधी

**केंद्र सरकार कडधान्य उत्पादनातील तूट भरून काढण्यासह आयात कमी करण्यासाठी कडधान्य आत्मनिर्भरता अभियान राबवत आहे. याच कडधान्य आत्मनिर्भरता अभियानाला राबवण्यासाठी राज्य सरकारने शासकीय मान्यता शुक्रवारी (दि..२८) दिली आहे. राज्यातील ३४ जिल्ह्यांमध्ये २०२५–२६ ते २०३०–३१ या कालावधीत अभियान राबवले जाणार असल्याचे शासन निर्णयात स्पष्ट करण्यात आले आहे.**

केंद्र सरकारने या अभियानासाठी २०२५–२६ ते २०३०–३१ या कालावधीसाठी ११ हजार ४४० कोटींची तरतूद केली आहे. राज्यातील विविध कृषी–हवामान पट्ट्यातील ३४ जिल्ह्यांमध्ये हे अभियान राबवले जाईल. यामध्ये कडधान्य उत्पादनासाठी योग्य शेती क्षेत्र, पिक पध्दती, हवामान आणि मागील हंगामातील उत्पादन क्षमता या निकषांवर जिल्ह्यांची निवड करण्यात आली आहे. यामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि महिला शेतकऱ्यांना विविध योजनांतून लाभ देण्यात येणार आहे. केंद्र सरकार या अभियानासाठी मूलभूत बियाणे खरेदी आणि



पायाभूत बियाणे उत्पादनासाठी १०० टक्के हिस्सा उचलणार आहे. तर उर्वरित बाबीसाठी ६०;४० प्रमाणे केंद्र आणि राज्य हिस्सा राहील, असे शासन निर्णयात

▶▶ पान २ वर

### कडधान्याबाबतचे सरकारचे आयात धोरण चुकीचे...

केंद्र सरकारने कडधान्य आयातीसाठी पायघड्या पसरलेल्या आहेत. देशात २०२४–२५ या आर्थिक वर्षात विक्रमी ६७ लाख टन कडधान्य आयात केली आहे. कडधान्य आयातीचा लोंढा सुरु असल्याने देशातील तूर, हरभरा, मुग आणि उडीद उत्पादक जेरीस आले आहेत. त्यामुळे एकीकडे केंद्र सरकार कडधान्य उत्पादन वाढवण्यासाठी प्रयत्न करत असल्याचा आव आणत आहे. तर दुसरीकडे मात्र कडधान्याच्या खुल्या आयात धोरणामुळे शेतकऱ्यांना किफायतशीर दरही मिळत नाही. सरकार केवळ कडधान्याचे दर नियंत्रणात ठेवण्यासाठी आटापिटा करत असल्याचे दिसते. त्यामुळे कडधान्य उत्पादन वाढीच्या उद्दिष्टावर सरकारच पाणी ओतत असल्याचे जाणकार सांगतात.

# तर नव्याने आरक्षण सोडत काढणार

## न्यायालयाच्या आदेशानंतर निवडणूक आयोग सक्रिय

मुंबई । वृतसंस्था

**राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडू नका असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतर आता राज्याचे निवडणूक आयोग सक्रिय झाल्याचं दिसतंय. निवडणुकीत ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षण मर्यादा ओलांडणार नाही, त्यासाठी जिथं जास्त आरक्षण कोटा असेल तिथं पुन्हा सोडत करण्यात येणार असल्याची सूत्रांनी माहिती दिली. सुप्रीम कोर्टातली पुढली सुनावणी २१ जानेवारीला होणार आहे. मात्र सर्व निवडणुका कोर्टाच्या संभाव्य आदेशाधीन राहणार आहेत.**

सर्वोच्च न्यायालयाने राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीला स्थगिती न देता ती ठरलेल्या वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे सध्या सुरू असलेल्या नगरपालिका निवडणुकीची प्रक्रिया कायम राहणार आहे. मात्र ज्या ठिकाणी ओबीसी आरक्षणाची मर्यादा ओलांडली आहे त्या



ठिकाणचा निकाल हा न्यायालयाच्या संभाव्य निकालाच्या अधीन राहील असा निर्णय दिला आहे. तसेच राज्यातील जिल्हा परिषद, पंचायत समित्या आणि महाालिकेच्या निवडणुकीत आरक्षणाची मर्यादा न ओलांडता निवडणुका घ्या असे निर्देशही दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर आता ज्या ठिकाणी आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडली आहे त्या जिल्हा परिषद आणि २ महापालिकांमध्ये नव्याने आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे. जिथ जास्त आरक्षण झाले तिथं

▶▶ पान २ वर

## वऱ्हाडी कवी मिर्झा रफी अहमद बेग यांचे निधन

अमरावती । प्रतिनिधी

**महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध कवी, हास्यसम्राट डॉ. मिर्झा रफी अहमद बेग यांचे निधन झाले. शुक्रवार दि. २८ नोव्हेंबर रोजी सकाळी ६.३० वाजता त्यांनी अखेरचा श्वास घेतला. ते ६८ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी फातेमा मिर्झा, मुलगा रमीज आणि महाजबी, हुमा या दोन कन्या असा परिवार आहे.**



यवतमाळ जिल्ह्यातील नेर तालुक्यातील धनज–माणिकवाडा हे त्यांचे मूळ गाव आहे. ते अमरावतीमधल्या नवसारी परिसरात 'मिर्झा एक्स्प्रेस' या घरात ते राहत होते.

डॉ. मिर्झा रफी अहमद बेग यांचा जन्म १७ सप्टेंबर १९५७ रोजी झाला होता. वयाच्या अकराव्या वर्षापासून त्यांनी कविता लिहायला सुरुवात केली होती. तर १९७० पासून त्यांनी मंचावर कविता सादर करायला सुरुवात केली. त्यांनी वृत्तपत्रांमध्ये

▶▶ पान २ वर

## लाडक्या बहिणींमुळे बारा राज्याच्या तिजोऱ्या रिकाम्या

नवी दिल्ली । वृतसंस्था

काही राज्यांमध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये महिला मतदारांनी राजकीय पंडितांचे अंदाज खोटे ठरवले. याचे एक मोठे कारण म्हणजे या राज्यांमधील थेट लाभ हस्तांतरणसारख्या आकर्षक योजना मानल्या जात आहेत. या योजना 'गेम चेंजर' ठरत असल्या तरी, त्यांचा मोठा भार राज्यांच्या तिजोरीवर पडत आहे. पीआरएस लेजिस्लेटिव रिसर्च या



संस्थेच्या अहवालानुसार, २०२५–२६ या आर्थिक वर्षात, अशा योजनांवर १२ राज्यांमध्ये अंदाजे १.६८ लाख कोटी रुपये खर्च होणार आहेत.

▶▶ पान २ वर

## जिथे विजयाची गॅरंटी नाही तिथे राष्ट्रवादीचे खासदार ठाण मांडून

### जिल्ह्यातील तुतारीचे उमेदवार सोडले वाऱ्यावर

बीड । प्रतिनिधी

नगरपालिका निवडणुका सर्वच पक्षांनी प्रतिष्ठेच्या केलेले आहेत अशातच बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे यांनी नगरपालिका आपल्या पक्षाच्या ताब्यात आणण्यासाठी जिल्हाभर प्रयत्न करणे गरजेचे असताना ज्या मुंडे बहीण भावा चा पगडा आहे त्या परळी मध्ये शरद पवार गटाचे खासदार ठाण मांडून आहेत जिथे विजयाची गॅरंटी नाही अशा ठिकाणी बसून आहेत मात्र इतर ठिकाणी असलेले तुतारीचे उमेदवार खासदारांनी वाऱ्यावर सोडले अशी चर्चा जिल्ह्यात सुरू आहे.

बीड जिल्ह्यातील बीड सह परळी अंबाजोगाई धारूर माजलगाव आणि गेवराई या सहा नगरपालिकेची निवडणूक आता अंतिम टप्प्यात आलेली आहे या सर्व ठिकाणी महाविकास आघाडी व महायुती स्वतंत्रपणे निवडणुका लढत आहे सर्वच ठिकाणी मैत्रीपूर्ण



लढती असल्या तरी आपल्या पक्षाच्या ताब्यात अधिक नगरपालिका याव्यात यासाठी प्रयत्न करणे गरजेचे असताना राष्ट्रवादी शरद चंद्र पवार गटाचे खासदार मात्र परळी मध्येच ठाण मांडून बसत आहे त्यांनी अद्यापही बीड गेवराई अंबाजोगाई धारूर

▶▶ पान २ वर

## राज्याच्या मुख्य सचिवपदी अग्रवाल

मुंबई । प्रतिनिधी



राज्याचे मुख्य सचिव असलेले राजेश कुमार यांच्याकडील कार्यभार आता अप्पर मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्याकडे देण्यात येणार असून आता राज्याचे नवे मुख्य सचिव म्हणून राजेश अग्रवाल हे काम पाहतील

राजेश कुमार हे राज्याचे मुख्य सचिव होते आता त्यांचा पदभार हा राजेश अग्रवाल यांच्याकडे आज राज्य शासनाने दिला विशेषता ३० नोव्हेंबर रोजी हा पदभार घेण्यात यावा मुख्य अपर्सचिव यांनी दिले आहे यांच्याकडे काही अतिरिक्त पदभार देखील घेण्यात यावा असे नेमणूक पत्रामध्ये नमूद आहे आता राजेश कुमार यांच्या ऐवजी राजेश अग्रवाल हे राज्याचे मुख्य सचिव असतील.

## जयदत्त अण्णांच्या सभेचा खरंच भाजपाला फायदा होणार का?

बीड । प्रतिनिधी

माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचा राजकारणामध्ये मोठा धबधबा आहे बीड शहरांमध्ये देखील मोठी पकड आहे मात्र आता ते कोणत्याच पक्षांमध्ये नाहीत अशावेळी त्यांनी भाजपा उमेदवाराच्या विजयासाठी घेतलेल्या सभा मुळे त्याचा कितपत परिणाम मतदारावर होईल हे सांगणे सध्या तरी कठीण आहे कारण मतदारसंघ करताना



दिसत आहेत डॉक्टर योगेश भाजपमध्ये आहेत मात्र अण्णा नेमक्या कोणत्या पक्षात असा प्रश्न अनेकांना पडला आहे.

क्षीरसागर कुटुंबीयांचे जिल्ह्याच्या राजकारणामध्ये मोठे योगदान आहे काकू पासून ते थेट आजच्या पिढीपर्यंत आजही माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांची राजकारणावर पकड आहे त्यांना मानणारा सर्व समाजातील मोठ्या प्रमाणात वर्ग देखील आहे मात्र आज स्थितीला

▶▶ पान २ वर

# उमेदवार दारोदार पण १ डिसेंबरला १० च्या आत घरात

मुंबई । प्रतिनिधी

**सध्या राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरु आहे. या निवडणुकीच्या प्रचारामध्ये प्रत्येक पक्षाने आपली कंबर कसली आहे. काही तालुक्यांमध्ये सर्व पक्ष स्वबळावर लढत आहेत तर, काही ठिकाणी युती आणि आघाडी एकत्र लढत आहेत. त्याचदरम्यान, आता सर्वांना एकच प्रश्न पडलाय तो म्हणजे, या निवडणुकीचे प्रचार आता कधी थांबणार आहेत.प्रचाराची मुदत १ डिसेंबरला संपत असल्याने उमेदवारांना त्याच रात्री १० वाजता प्रचार बंद करावा लागणार**

महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने नगरपरिषद आणि नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी जाहीर प्रचारबंदीच्या कालावधीतबाबत सुधारित आदेश जारी



केले आहेत. या सुधारणेनुसार, मतदान सुरु होण्यापूर्वी प्रचाराची समाप्ती कधी होईल? याबद्दलची पूर्वीची तरतूद बदलण्यात आली आहे. निवडणूक आयोगाच्या ४ नोव्हेंबर २०२५च्या एकत्रित आदेशातील आचारसंहितेबाबत तरतूद सुधारित करण्यात आली आहे. त्यानुसार आता मतदान सुरु होण्याच्या दिवशीच्या अगोदरच्या दिवशी रात्री १० वाचता प्रचाराची सांगता होणार आहे. म्हणजे, २ डिसेंबर २०२५ला मतदान पार पडत असल्याने आदल्या दिवशी म्हणजे, १ डिसेंबर २०२५ला रात्री १० वाजता प्रचारकार्यक्रम थांबणार आहेत. १ डिसेंबर २०२५च्या रात्री १० वाजल्यापासून सभा, मोर्चे, भोंग्यांचा वापर, उद्घाटन समारंभ, निवडणूक प्रचाराच्या संबंधित कोणतीही जाहिरात किंवा प्रसिद्धी होईल, अशा गोष्टींवर पूर्णपणे निर्बंध लावण्यात येतील. यापूर्वी ४ नोव्हेंबर २०२५च्या आदेशात मतदान सुरु होण्यापूर्वी २४ तास अगोदर प्रचार बंद होईल, अशी तरतूद होती. दरम्यान, अधिनियमातील तरतुदीशी साम्यत्व राखण्यासाठी आता हा बदल करण्यात आला असल्याचं सांगण्यात आलं आहे. निवडणूक आयोगाचे आयुक्तांच्या आदेशानुसार सचिव सुरेश काकाणी यांनी हे सुधारित आदेश काल गुरुवारी जारी केले आहेत. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ५० टक्के आरक्षणाची

▶▶ पान २ वर



## गर्जेसह मृत गौरीच्या शरीरावरही जखमा

मुंबई । प्रतिनिधी

**मुंबईतील वरळी परिसरात डॉक्टर गौरी पालवे–गर्जे यांच्या मृत्यूने राज्यात मोठी खळबळ उडाली आहे. आत्महत्येचे स्वरूप असलेल्या या घटनेने आता गंभीर वळण घेतले आहे.तिच्या सह पतीच्या अंगावर जखमा आढळल्याने आता या आत्महत्या प्रकरणाला वेगळे वळण मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही.**

घटना उघड झाल्यानंतर वरळी पोलिसांनी तत्काळ अनंत गर्जे याला

▶▶ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२८ नोव्हेंबर २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ३८.०० क्विंटल | २,२५१ | ३,००० | २,७७९ |
| ज्वारी/हायब्रिड: ६३.०० क्विंटल | २,९०० | ३,२११ | २,८५४ |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | १,६२६ | १,६२६ | १,६२६ |
| तूर: ३.५० क्विंटल | ६,४०० | ६,४०० | ६,४०० |
| उडीद: १९.०० क्विंटल | ३,००० | ५,३५१ | ४,५९२ |
| बाजरी: ३२.५० क्विंटल | २,५०१ | ३,१३१ | २,८२६ |
| मुग: २.०० क्विंटल | ५,१०१ | ५,१०१ | ५,१०१ |
| सोयाबीन: १०.०० क्विंटल | ४,५०० | ४,५०० | ४,५०० |
| हरभरा: १.०० क्विंटल | ५,२०० | ५,२०० | ५,२०० |

cmyk

cmyk



अग्रलेख

# अमिष देण्याचा सत्ताधाऱ्यांचा घातक प्रयत्न !

कोणत्याही निवडणुकीमध्ये सर्व पक्ष जे निवडणूकविषयक जाहीरनामे प्रसिद्ध करतात ते पूर्ण करण्यासाठी नसतात असा एक गर्भित अर्थ नेहमीच्या जाहीरनाम्यांच्या प्रसिद्धीमागे असतो. प्रत्येक निवडणुकीमध्ये तीच तीच आश्वासने देणारा सारख्याच प्रकारचा जाहीरनामा जाहीर का केला जातो हा संशोधनाचा विषय ठरू शकतो. जर सत्ताधारी पक्ष सत्तेचा वापर करून निधीच्या माध्यमातून मतदारांना लालूच दाखवण्याचा प्रयत्न करत असतील तर विरोधी पक्षसुद्धा आम्हाला सत्तेवर आणा, आम्ही सत्ताधारी पक्षांपेक्षा जास्त चांगले काम करू अशी लालूच दाखवू शकतात. पण तुलनात्मकदृष्ट्या सत्ताधारी पक्षाच्या आश्वासनांवर मतदारांचा जास्त विश्वास बसतो. केंद्रात भाजपचे सरकार आहे आणि राज्यातही भाजपचे सरकार आहे, त्यामुळे नगरपालिकांमध्ये सुद्धा भाजप किंवा महायुतीची सत्ता आली तर डबल इंजिन सरकारच्या माध्यमातून त्या नगरपरिषदांचा विकास होईल अशा प्रकारचे आश्वासन देण्याचा उद्देश अजित पवार किंवा चंद्रकांत पाटील यांचा होता अशी मखलाशी महायुतीच्या घटक पक्षांकडून करण्यात येत असली, तरी तुम्हाला जर विकासकामांसाठी निधी हवा असेल तर आम्हाला सत्तेवर आणावे लागेल, अशा प्रकारचा एक गर्भित इशारा सत्ताधारी पक्षांनी दिला आहे आणि त्यासाठीच तिजोरीची भाषा महाराष्ट्राच्या निवडणुकीच्या राजकारणात सुरू झाली आहे, हे उघड आहे. लोकशाहीच्या दृष्टीने सत्याधाऱ्यांचा अमिष दाखविण्याचा हा प्रयत्न घातकच आहे असे म्हणावे लागेल.

महाराष्ट्रामध्ये नगरपरिषदा आणि नगरपंचायती निवडणुकीचे धुमशान सुरू आहे. या निमित्ताने सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष यांच्यामध्ये प्रचाराचे तुंबळ युद्धही रंगताना दिसत आहे. याच पार्श्वभूमीवर आता प्रचारामध्ये राज्याच्या तिजोरीचा विषय समोर आला आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री आणि अर्थ खात्याची जबाबदारी असलेले अजित पवार यांनी निवडणूक प्रचाराच्या व्यासपीठावरून बोलत असताना 'अर्थमंत्री या नात्याने राज्याची तिजोरी माझ्या हातात असून निधीची कमतरता कधीच भासणार नाही, तुम्ही मत द्या मी तुम्हाला निधी देतो' अशा प्रकारची घोषणा केली होती. या घोषणेला वेगळ्या प्रकारचे उत्तर देताना भाजपचे ज्येष्ठ नेते चंद्रकांत पाटील यांनी 'अजित पवारांकडे जरी अर्थ खाते असले तरी राज्याच्या तिजोरीचे मालक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच आहेत' अशी घोषणा केली होती.

काही दिवसांपूर्वी राज्याचे महसूल खाते सांभाळणारे चंद्रशेखर बावनकुळे यांनी विदर्भात एके ठिकाणी प्रचार सभेमध्ये बोलत असताना 'आम्हाला मत द्या आम्ही जिल्हाधिकाऱ्यांना सांगून तुमची सगळी शेतीविषयक कामे करून देऊ' अशा प्रकारचे आश्वासन दिले होते. अजित पवार, चंद्रकांत पाटील किंवा चंद्रशेखर बावनकुळे यांनी केलेल्या या विधानांवर विरोधी पक्षांनी अपेक्षेप्रमाणे आक्षेप घेतला असला, तरी सत्ताधारी पक्षांना याबाबत वावगे काहीच वाटत नाही. ज्या प्रकारे निवडणुकीचा जाहीरनामा जाहीर करण्याची पद्धत आहे, त्याच प्रकारे निवडणुकीच्या कालावधीत प्रचारामध्ये अशा प्रकारची आश्वासने दिलीच जातात, अशा प्रकारचा बचाव सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांकडून करण्यात येत आहे. निवडणुकीच्या प्रचाराच्या व्यासपीठावरून अशा प्रकारची भरमसाठ आश्वासने नेहमीच दिली जातात आणि त्यामध्ये मतदारांना लालूच दाखवण्याचा किंवा आमिष दाखवण्याचा कोणताही प्रकार नसतो हे निवडणूक आयोगानेही यापूर्वी मान्य केले असल्यामुळे अशा प्रकारच्या विधानांवर निवडणूक आयोगाच्या पातळीवर कोणतीही कारवाई होण्याची शक्यता नसते. पण विरोधी पक्ष मात्र आपल्या पातळीवर प्रचाराचा मुद्दा म्हणून सत्ताधारी पक्षांच्या या मानसिकतेवर बोट ठेवू शकतात. गेल्या काही कालावधीमध्ये झालेल्या विधानसभा निवडणुका पाहिल्या तर सत्ताधारी पक्षाने त्यांच्या हातात असलेल्या सत्तेचा वापर करून अनेक योजना जाहीर करून महिला मतदारांना किंवा इतर काही विशिष्ट मतदारांना आपल्याकडे ओढण्याचा प्रयत्न केला आणि तो प्रयत्न यशस्वी झाला हे सिद्ध होताना दिसत आहे.

सध्याच्या महाराष्ट्राच्या खिचडी राजकारणामध्ये नगरपालिकांमध्ये एखादी सत्ता मिळणे हासुद्धा प्रतिष्ठेचा विषय असल्यामुळेच महायुतीच्या घटक पक्षांनी हा विषयसुद्धा लावून धरला आहे. त्यातूनच हा निधीचा आणि तिजोरीच्या चाव्यांचा विषय समोर आला आहे. कोणत्याही निवडणुकीमध्ये नेहमीच सत्ताधाऱ्यांना एक ॲडव्हान्टेज असतो. तो या निवडणुकीतही सत्ताधारी महायुतीला होताना दिसत आहे. सत्ताधारी पक्षांपेक्षा वरचढ आश्वासने जरी विरोधी पक्षांनी दिली तरी त्याला मतदार प्रतिसाद देताना दिसत नाहीत हेसुद्धा वास्तव आहे. विधानसभा निवडणुकीमध्ये लाडकी बहीण योजना गाजत असताना विरोधी पक्षांनी १५०० पेक्षा जास्त रक्कम आम्ही देऊ असे जाहीरनाम्यात नमूद केले असूनही महिला मतदारांनी त्याकडे दुर्लक्ष केले होते हे वास्तव ठळकपणे लक्षात घ्यायला हवे.

अर्थात निवडणुकीच्या काळात दिलेली आश्वासने पूर्ण केली जातात असेही नाही आणि नक्कीच एखाद्या गटाने किंवा विभागाने आपल्याला मतदान केले नाही म्हणून त्या विभागाला किंवा त्या प्रदेशाला कमी निधी देण्याचे धोरण अवलंबणे अशक्य असते हे वास्तवही महत्त्वाचे आहे. साहजिकच आमच्या हातात तिजोरी असल्यामुळे तुम्ही आम्हाला मते द्या आम्ही तुम्हाला निधी देऊ हे अजित पवार किंवा चंद्रकांत पाटील यांचे वक्तव्य मतदारांना किती महत्त्वाचे वाटत आहे हे निवडणुकीच्या निकालानंतर स्पष्ट होणार आहे.

# पाटोद्यात महाराष्ट्र ग्रामीण बँक असून अडचण नसुन खोळंबा

## कधी कॅश नसते तर कधी नेट पार्किंग व्यवस्था नसल्याने ग्राहक त्रस्त

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहराच्या मध्यवर्ती भागात महाराष्ट्र ग्रामीण बँक असूनही ग्राहकांना सुरळीत सेवा मिळण्याऐवजी सततची खोळंबा व गैरसोय सहन करावी लागत आहे. बँकेत वारंवार कधी कॅश उपलब्ध नसते तर कधी नेटवर्क ठप्प होते. त्यामुळे बँकेसमोर व्यवहारासाठी येणाऱ्या ग्राहकांच्या रांगा लागतात दिवसभरात अनेकांना हातची कामे राहून परत फिरावे लागत असल्याने नाराजी वाढली आहे. ग्राहकांचे म्हणणे आहे की, ''बँकेत येतो तेव्हा कधी कॅश संपलेली असते, कधी इंटरनेट बंद असते. कोणतीही पूर्वसूचना नसल्याने अंगावरच येते. ही परिस्थिती जवळपास रोजचीच झाली आहे.'' बँकेसमोर स्वतंत्र पार्किंगची व्यवस्था नसल्याने ग्राहकांना आपली वाहने थेट रस्त्यावर उभी करावी लागतात. त्यामुळे त्या भागात वाहतूक कोंडी, अडथळा व गोंधळाचे वातावरण निर्माण होते. विशेषतः सकाळ व दुपारच्या वेळी रस्त्यावर वाहनांची



गर्दी वाढत असून नागरिकांना आणि वाहनचालकांना अडचणींचा सामना करावा लागतो. स्थानिक नागरिकांच्या मते, बँकेसमोर उभ्या राहणाऱ्या वाहनांमुळे रस्त्याची रुंदी कमी होते, दोन्ही बाजूंनी वाहने अडकतात आणि लहान अपघातांची प्रमाणही वाढले आहे. अनेक वेळा पादचाऱ्यांना रस्त्यातून जाणे कठीण होते.सततची वाहतूक कोंडी, बेताल पार्किंग, बँकेसमोरची गर्दी या सर्वांमुळे बँक परिसरात सुरक्षेचा प्रश्न निर्माण होत आहे. नागरिकांच्या मते, एखादी आपत्कालीन परिस्थिती उद्भवली तर तातडीची वाहतूक पुढे सरकवणे अवघड होईल.प्रशासनाने लक्ष देण्याची गरज वारंवाराच्या कॅश-नेट तुटवडा, सेवा ठप्प होणे आणि पार्किंगचा प्रश्न या सर्वांवर बँक व्यवस्थापनाने व स्थानिक प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्राहक करत असून बँक व्यवस्थापनाला याचा फारसा फरक पडत नसल्याचीही खंत व्यक्त करण्यात येत आहे.

# कोणाच्याही दबावाला बळी न पडता विकासाच्या मुद्यावर मतांचे आशिर्वाद द्या-आ.विजयसिंह पंडित

**बीड । प्रतिनिधी**

**शहरात राष्ट्रवादी कॉंग्रेस व मित्र पक्षाच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार श्रीमती प्रेमलता पारवे यांच्यासह नगरसेवक पदाच्या सर्व उमेदवारांच्या प्रचारार्थ आ. विजयसिंह पंडित यांनी प्रचार सभांचा धडाका उडवून दिला असून शहरातील रामतिर्थ, हनुमाननगर व आदर्शनगर येथे झालेल्या प्रचार सभेला रेकॉर्डब्रेक गर्दी झाली. आ. विजयसिंह पंडित, माजी नगरसेवक दिलीप गोरे यांच्यासह राष्ट्रवादी-शिवसेना-शिवसंग्राम व मित्रपक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी विरोधकांचा खरपूस समाचार घेत मतदारांना आवाहन केले. बीड शहरात कोणाचीही दादागिरी खपवून घेतली जाणार नाही.**



**कोणाच्याही दबावाला बळी न पडता विकासाच्या मुद्यांवर मतांचे आशिर्वाद देऊन बीड नगर परिषदेत परिवर्तन घडवा असे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले.**

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष-शिवसेना-शिवसंग्राम-सपा व मित्रपक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार श्रीमती प्रेमलता पारवे यांच्यासह प्रभाग क्र. ३ मधील नगरसेवक पदाचे उमेदवार सौ. सरवदे रेशमा रामदास आणि अमर मारुतीराव नाईकवाडे तसेच प्रभाग क्र. ९ मधील उमेदवार शेख शाहेद मुजफ्फर, सौ. पोपळे पुष्पा प्रभाकर यांच्या प्रचारार्थ रामतिर्थ, हनुमाननगर आणि आदर्श नगर येथे झालेल्या प्रचार सभेला आ. विजयसिंह पंडित, माजी नगरसेवक दिलीप गोरे, इरफान बागवान, रामदास सरोदे, बबनराव डोईफोडे, नागसिंग मस्के, सुभाष मोरे, दिगांबर फाटे, शिऊरभाई शेख, सुहास पाटील, अनिल घुमरे, श्रीमती प्रज्ञाताई खोसरे, शेख मुजीबभाई, ॲड.बाळासाहेब कोल्हे, इरफान बागवान, हमरून इरफान, सुनिल चव्हाण, चौरे आर.एस. यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### मी आत्तापर्यंत प्रामाणिक काम केले-अमर नाईकवाडे

यावेळी बोलताना उमेदवार अमर नाईकवाडे म्हणाले की, गेली अनेक वर्षे माझ्या मतदार बंधु-भगिनींनी विश्वास दाखवला तो मी सार्थ केला, मिळालेल्या संधीचा उपयोग मी प्रामाणिकपणे करून विकास कामे केली. यापुढील काळात उर्वरित विकास कामे गतीने पूर्ण करून रामतिर्थ आणि परिसराचा कायापालट करू. राशन दुकान, आरोग्य सुविधा, अंगणवाडी आदी सुविधा उपलब्ध करून देऊ, त्यासाठी पुन्हा एकदा आशिर्वाद देऊन नगर परिषदेत पाठवा असे आवाहन त्यांनी केले.

## राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये संविधान दिनानिमित्त विविध स्पर्धा संपन्न

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

**हमारा संविधान - हमारा स्वाभिमान संकल्पनेवर आधारित राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये संविधान स्वीकृती दिनानिमित्त हमारा संविधान- हमारा स्वाभिमान उपक्रमक्रमानिमित्त राज्यशास्त्र विभाग, राष्ट्रीय सेवा योजना व सांस्कृतिक विभागाच्या वतीने कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी राज्यशास्त्र विभागाच्या वतीने वकृत्व स्पर्धा व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने निबंध स्पर्धा व प्रश्नमंजुषा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून स्पर्धेस सुरुवात करण्यात आली वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक शेख अमन असद द्वितीय क्रमांक कुमारी वैष्णवी अशोक साळवे, तृतीय क्रमांक कुमारी अंकिता तिडके तर निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक राधा भागवत भूतकर, द्वितीय क्रमांक वैष्णवी बाबुराव शिंपले, तृतीय क्रमांक ओम सुरवसे यांनी प्राप्त केला.**

या सर्व यशस्वी स्पर्धक विद्यार्थ्यांचे प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांचे हस्ते बक्षिसाची रोख रक्कम व थोर पुरुषांचे ग्रंथ भेट देऊन स्वागत करण्यात आले. या स्पर्धेचे अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य गोपाळ काकडे असे म्हणाले की, भारतीय संविधान हे एक दस्तऐवज नाही तर ते जीवन जगण्याचा मार्ग आहे आपण हक्काची मागणी करतो कर्तव्य सुद्धा प्रत्येक नागरिकांनी पार पाडले पाहिजे व जीवनात यशस्वी होण्यासाठी प्रत्येकाने सविधान वाचले पाहिजे व ते आचरणात आणले पाहिजे तसेच वक्तृत्व स्पर्धेचे प्रास्ताविक प्रा. एन. एस. वाघमारे केले या कार्यक्रमाला उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. एल. जाधवर, प्रा. बालासाहेब जोगदंड कार्यालय अधीक्षक श्री. सुभाष वायाळ प्रा. विनायक कापावार महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. विजयकुमार कुंभारे यांनी मानले.

# मुक्त पत्रकारांना असंगठित कामगाराचा दर्जा द्यावा

## पत्रकार परिषदेची राज्य सरकारकडे मागणी

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील मुक्त, फ्रीलान्स, डिजिटल रिपोर्टर, स्ट्रिंगर आणि स्वतंत्र प्रतिनिधी म्हणून काम करणाऱ्या हजारो पत्रकारांना औपचारिक सेवा-सुविधा उपलब्ध नसल्याने त्यांना तातडीने 'असंगठित कामगार' म्हणून मान्यता देण्याची मागणी राज्याच्या कामगार मंत्र्यांकडे करण्यात आली आहे. अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुंबई विभागीय सचिव दीपक कैतके यांनी कामगार मंत्री आकाश फुंडकर यांना दिलेल्या विस्तृत निवेदनात या पत्रकारांना भेडसावणाऱ्या असुरक्षिततेचे चित्र स्पष्ट केले असून त्यांच्या सामाजिक सुरक्षा, आरोग्य संरक्षण आणि आर्थिक सुरक्षिततेसाठी तातडीची पावले उचलण्याची विनंती केली आहे.

निवेदनात नमूद केले आहे की, महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर मुक्त आणि फ्रीलान्स पद्धतीने पत्रकारिता करणारा वर्ग आहे. ग्रामीण, उपनगरी आणि शहरांमध्ये वृत्तपत्र, डिजिटल प्लॅटफॉर्म, न्यूज पोर्टल, टीव्ही आणि स्थानिक माध्यमांसाठी काम करणारे अनेक पत्रकार कोणत्याही संस्थेशी औपचारिक करारात नसतात. त्यांना नियमित वेतन, भविष्य निर्वाह निधी (झऋ), एडखउ, आरोग्य विमा, पेन्शन, ग्रॅच्युइटी किंवा कोणतीही सामाजिक सुरक्षा सुविधा मिळत नाही. त्यांचे उत्पन्न हे रीीळसपाशपीं-लरीशव किंवा ळिशलश-रीींश पद्धतीने असते. अशा स्वरूपाचा रोजगार णपीसरपळीशव थीज्ञशीी डेलळरश्र झशलीीळूं -लीं, २००८ मधील असंगठित कामगारांच्या व्याख्येत स्पष्टपणे बसतो, असे कैतके यांनी अधोरेखित केले आहे. पत्रात असे सांगण्यात आले आहे की हे पत्रकार लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाची मुलभूत जबाबदारी निभावत असले तरी त्यांचे जीवन सतत धोक्यातून जात आहे. ग्रामीण व मागास भागातील अनेक पत्रकार वाहतूक, उपकरण, तांत्रिक सुविधा, इंटरनेट, सुरक्षितता आणि प्रसंगोपात येणाऱ्या कायदेशीर-प्रशासकीय अडचणी यांचा संपूर्ण भार स्वतः उचलतात. याउलट त्यांना कोणत्याही संस्थेकडून किंवा शासनाकडून सामाजिक सुरक्षा मिळत नाही. अनेक वेळा धोकादायक परिस्थितीत काम करूनही अपघात विमा किंवा आपत्कालीन मदतीचे कोणतेही संरक्षण उपलब्ध नसते. या परिस्थितीला राज्य सरकारने सकारात्मकतेने हाताळावे, असा आग्रह यामध्ये व्यक्त करण्यात आला आहे. पत्रकार परिषदेने राज्य सरकारसमोर काही प्रमुख मागण्या मांडल्या आहेत. मुक्त आणि फ्रीलान्स पत्रकारांना औपचारिकपणे 'असंगठित कामगार' म्हणून मान्यता देऊन त्यांची अधिकृत नोंदणी सुरू करावी. असंघटित कामगार मंडळामार्फत पत्रकारांची तातडीने नोंदणी केली तर त्यांना सामाजिक सुरक्षा योजनांचे थेट लाभ मिळू शकतील. तसेच महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेत पत्रकारांना समाविष्ट करून मोफत उपचार, आपत्कालीन सेवा आणि आरोग्य संरक्षण मिळावे, अशी मागणी करण्यात आली आहे. याशिवाय अपघात विमा, पेन्शन, मातृत्व सहाय्य, आपत्कालीन आर्थिक मदत आणि इतर सामाजिक सुरक्षा योजना पत्रकारांसाठी खुल्या कराव्यात, असा आग्रह व्यक्त केला आहे. निवेदनात असेही नमूद केले आहे की जिल्हा आणि तालुकास्तरावर पत्रकार ओळख पडताळणीची स्वतंत्र व पारदर्शक व्यवस्था उभारली गेली तर फेक किंवा बोगस पत्रकारांची समस्या कमी होऊन प्रत्यक्ष काम करणाऱ्या पत्रकारांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळू शकेल. नियमितपणे प्रकाशित होणाऱ्या बातम्या, रिपोर्ट, फोटो, व्हिडिओ इत्यादींच्या आधारे पत्रकारांची पात्रता निश्चित करण्याची मागणी करण्यात आली आहे. पत्राच्या शेवटी, मुक्त पत्रकारांचे काम महत्त्वाचे असून लोकशाहीच्या कार्यप्रणालीत त्यांचे योगदान अनन्यसाधारण असल्याचे नमूद करण्यात आले आहे. ते जनतेच्या समस्या, प्रशासनातील त्रुटी, स्थानिक घडामोडी, सामाजिक मुद्दे आणि शासनाच्या निर्णयांची माहिती लोकांपर्यंत पोहोचवतात. परंतु या कामासाठी आवश्यक असलेली संरक्षण व्यवस्था, सुरक्षितता आणि आर्थिक स्थैर्य नसल्याने हा वर्ग सतत जोखमीचा सामना करत आहे. अशा परिस्थितीत शासनाने सकारात्मक आणि सहानुभूतीपूर्वक निर्णय घेऊन महाराष्ट्रातील हजारो पत्रकारांना सामाजिक सुरक्षिततेचा आधार द्यावा, अशी विनंती निवेदनात करण्यात आली आहे.

## पान १ वरून...

### कडधान्य आत्मनिर्भरता अभियानाला

सांगण्यात आले आहे. तसेच अभियानातर्गत केंद्र सरकारने निश्चित केल्याप्रमाणे अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीसह शेतकरी महिलांना प्राधान्य देत प्रशिक्षण, प्रात्यक्षिके आणि इतर उपाययोजना राबवण्यात येणार आहेत. तर बियाणे वितरण, अनुदाने आणि उत्पादन योजना या सर्वांमध्ये या प्रवर्गांना अग्रक्रम ठेवण्यात येणार आहे. कडधान्य अभियानामुळे कडधान्य उत्पादनात लक्षणीय वाढ होईल. तसेच कडधान्य आयातीत घट होईल, असा दावा केंद्र सरकारकडून करण्यात येत आहे. तसेच शेतकऱ्यांचे बियाणे खर्च कमी करण्यासह उच्च प्रतीचे प्रजनन बियाणे उपलब्ध करून देणे, शेतकरी प्रशिक्षण व तंत्रज्ञान प्रसार वाढ आणि हेक्टरी उत्पादनात वाढ करण्याचा मनोदय केंद्र सरकारने स्पष्ट केला आहे.

--------------

### तर नव्याने आरक्षण

महिला ओबीसी, महिला आरक्षण सोडत नव्याने काढण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.सुप्रीम कोर्टात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत अतिशय महत्त्वाची सुनावणी पार पडली. सध्या सुरु असलेल्या नगरपंचायत, नगरपरिषद निवडणुकीचं काय होणार? तसेच, राज्यातील आगामी महापालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समितीच्या निवडणुका कधी होणार? असा प्रश्न अनेकांना पडला होता. त्यावर न्यायालयाने काही महत्त्वाचे निर्देश दिले.आता, पुढची सुनावणी २१ जानेवारीला होणार आहे. काही दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आगामी जिल्हा परिषदेच्या निवडणुका पुढे जाऊ शकतात असं वक्तव्य केलं होतं. त्यामुळे, सगळ्यांचीच धडधड वाढली होती. मात्र, सुप्रीम कोर्टाच्या आजच्या सुनावणीमुळे सर्वपक्षीयांच्या इच्छुकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

--------------

### जिथे विजयाची गॅरंटी नाही तिथे

माजलगाव मध्ये साधी बैठकी घेतली नाही परळी मधील निकाल काय लागणार हे सर्व जनतेला माहीत असताना जिथे यशस मिळणार नाही तिथे थांबून काय उपयोग असा सवाल मतदार करत आहेत अनेक राष्ट्रवादी काँग्रेस शरद चंद्र पवार गटाचे पदाधिकारी खासदार साहेब प्रचाराला कधी येतात हे पाहून आहेत मात्र खासदारांना केज परळी का सुटत नाही हा मोठा प्रश्न आहे गेवराई आणि बीडमध्ये आपल्या उमेदवाराची परिस्थिती चांगली असताना त्यांना हातभार लावण्यासाठी जिल्ह्याचे खासदार आपल्या पक्षासाठी मदत करतील ही अपेक्षा आता करणे उमेदवारांनी सोडले असल्याचे दिसत आहे याचा फायदा मात्र भाजपाला सर्वत्र होताना दिसत आहे.

-------------

### वऱ्हाडी कवी मिर्झा रफी

स्तंभलेखनही केले आहे. कृषी, शेतक-यांच्या समस्या, ग्रामीण भागातील समस्या, सामाजिक समस्या, राजकीय विरोधाभास यांसारख्या विषयांवर ते नर्म विनोदी शैलीमध्ये लिखान करायचे. त्यांचे वडील मिर्झा रज्जाक बेग हे यवतमाळ जिल्ह्यातील प्रभावी राजकीय आणि सामाजिक व्यक्तिमत्व होते.

--------------

### जयदत्त अण्णांच्या सभेचा खरंच

ते कोणत्याही पक्षांमध्ये नाहीत अशावेळी ते भाजपा उमेदवाराचा प्रचार करताना दिसत आहेत जे कोणत्याच पक्षात नाहीत मात्र पुतण्यासाठी भाजपचा प्रचार करतात तेव्हा क्षीरसागर यांचे निष्ठावंत भाजपालाच साथ देतील का असा देखील प्रश्न उपस्थित होत आहे अण्णा आपल्या भाषणामध्ये दिल्लीमध्ये भाजपचे सरकार आहे तेव्हा इथेही एक साखळी असावी त्यामुळे विकास होईल असे सांगत आहेत त्यातही भाजपा उमेदवारांचे विकास कामातील योगदान पक्षांमधील योगदान हे देखील पाहिले जात आहे अण्णा स्वतः मागील निवडणुकीतील पराभवानंतर राजकारणात फारसे रस नसल्यासारखेच दिसत आहेत मुंबईमध्ये थांबून बीड मधील विशेषतः शहरातील राजकारण त्यांनी हाताळले देखील असेल परंतु आता ते कोणत्याच पक्षात नाहीत आणि भाजपचा प्रचार करत असतील तर त्यांच्याच कार्यकर्त्यांनी नेमके काय करावे उद्या भाजपचा उमेदवार विजयी झाला तर विजयाचे श्रेय मात्र अण्णा ऐवजी पुतण्या डॉक्टर योगेश क्षीरसागर हेच घेतील आज मी तिला दोघेही एकत्र असले तरी अण्णांचा प्रचारातील सक्रिय सहभाग कितपत यश मिळवून देईल हे निकालानंतरच कळेल

--------------

### गर्जेसह मृत गौरीच्या

ताब्यात घेतले. शिवाय त्याच्यासह त्याचा भाऊ आणि बहिणीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अटकेनंतर अनंतला न्यायालयात हजर केले असता, त्याच्या शरीरावरही जखमांचे निशाण असल्याचे धक्कादायक निदर्शनास आले. केवळ अनंत नव्हे, तर मृत गौरीच्या शरीरावरही काही जखमा असल्याची पुष्टी पोलिसांनी केली आहे. यामुळे मृत्यूच्या आधी अनंत आणि गौरी यांच्यात काहीतरी गंभीर संघर्ष किंवा झटापट झाली का? असा संशय अधिकच गडद होत आहे. तसेच घटनाकाळातील दोघांच्या संभाषणाचे रेकॉर्डिंगही पोलिसांच्या हाती लागले असून त्याचाही तपास सुरू आहे. गौरी पालवे-गर्जे या मुंबईतील एका नामांकित वैद्यकीय संस्थेत काम करत होत्या. त्या हुशार, शांत आणि स्वावलंबी असल्याचे मैत्रिणी व सहका-यांचे म्हणणे आहे. मात्र काही महिन्यांपासून त्यांच्या दांपत्यात वाद सुरू असल्याचे माहिती आहे. अनंत गर्जेच्या कथित अफेअरमुळे दाम्पत्यात मतभेद वाढले होते, अशी माहिती सुरुवातीला समोर आली होती. याच वैयक्तिक जीवनातील तणावामुळे गौरीने आत्महत्या केली असावी अशी शक्यता सुरुवातीला मांडण्यात आली होती; परंतु आता मिळत असलेल्या पुराव्यांनुसार संपूर्ण प्रकरणात हिंसाचाराचा मोठा भाग असू शकतो, असे संकेत मिळत आहेत.

-----------

### उमेदवार दारोदार पण १ डिसेंबरला

मर्यादा ओलांडल्याच्या आक्षेपावर आज शुक्रवारी पुन्हा सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने हे प्रकरण तीन न्यायाधीशांकडे सुनावणीसाठी पाठवण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच पुढील सुनावणी २१ जानेवारीला ठेवण्यात आली आहे. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांना स्थगिती देण्यात आलेली नाही. त्यामुळे महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे.

------------

### लाडक्या बहिणींमुळे बारा

राजकीय विश्लेषकांच्या मते, या योजनांमुळे मतदारांची संख्या वाढली आणि कुटुंबाचा खर्चही सुधारला, पण देशाच्या अर्थव्यवस्थेवरचा बोजा वाढला आहे. सिविल्स डेलीच्या अहवालात म्हटले आहे की, रोख रकमेच्या हस्तांतरणामुळे महिलांचा सहभाग वाढला आहे, पण तो कायमस्वरूपी नाही. महिला योजना महिला सक्षमीकरणासाठी किती प्रभावी ठरतात, हा भविष्यातील प्रश्न आहे; पण सध्या तरी सर्वच राजकीय पक्ष या योजनांच्या भरवशावर निवडणुकीत यश मिळवण्याचा प्रयत्न करत आहेत. महिला योजना सर्व पक्षांच्या जाहीरनाम्यांचा अविभाज्य भाग बनल्या आहेत. पीआरएस इंडियाच्या अहवालानुसार, २०२४-२५ मध्ये ९ राज्यांनी डीबीटीवर १ लाख कोटी रुपये खर्च केले, ज्यामुळे राज्यांतील विकास कामांवर नकारात्मक परिणाम होत आहे. विशेष म्हणजे महाराष्ट्रासह देशातील या बारा कर्नाटक,मध्य प्रदेश ,महाराष्ट्र ,पश्चिम बंगाललक्ष्मी,ओडिशा ,तामिळनाडू ,झारखंडमैय्या ,आसाम ,छत्तीसगड ,दिल्ली.हरियाणा,आणि हिमाचल मध्ये या योजना सुरु आहेत राजकीय लाभासाठी सुरु करण्यात आलेल्या योजनेमुळे राज्याच्या तिजोऱ्या रिकाम्या होत आहेत .

-----------------

cmyk

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....



## थोडक्यात

### अश्वलिंग देवस्थानला भाऊसाहेब भवर यांची पाच लाखांची देणगी

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील अश्वलिंग देवस्थान हे मोठे आणि प्रशस्त देवस्थान म्हणून ओळखले जाते. देवस्थानाच्या विकासकामासाठी आमदार सुरेश धस यांच्या माध्यमातून ४ कोटी १० लक्ष रुपयांचे विकास काम पुर्ण झाले असून त्याचप्रमाणे आमदार सुरेश धस यांचे खंदे समर्थक भाऊसाहेब भवर यांनीही स्वतःच्या इच्छेने आणि स्वतःच्या खिशातून ५ लक्ष रुपये देत या अगोदरही पंढरपूरच्या मठासाठी २ लक्ष ११ हजार रुपये देणगी देऊन धार्मिक क्षेत्रातील आपले सामाजिक कार्य पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे.या योगदानाबद्दल सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे.

भाऊसाहेब भवर हे आमदार सुरेश धस यांचे सच्चे शिलेदार म्हणून ओळखले जातात. धार्मिक असो किंवा विकासकाम, कोणत्याही ठिकाणी मदत करण्यासाठी ते कधीही मागेपुढे पाहत नाहीत.अन्नदान असो, मंदिर विकास असो किंवा समाजकारणातील कोणतेही कार्य भाऊसाहेब नेहमी पुढाकार घेतात आणि सहकार्य करतात. त्यांच्या या कार्याबद्दल समाजाच्या सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. भविष्यातही त्यांच्या हातून असेच उपयुक्त, समाजाभिमुख काम घडेल याबाबत सामान्य नागरिकांमध्ये दृढ विश्वास आहे.जनतेचा विश्वास तडा जाऊ देणार नाही असा संदेश लोकनेते धस यांनी नेहमीच दिला असून त्यांच्या कार्यकर्त्यांमधूनही त्या मूल्यांची प्रचिती येत आहे.

### कोणतीही चौकशी लावा पण बिनबुडाचे आरोप करू नका-आ.सुरेश धस

आष्टी । प्रतिनिधी

राम खाडे यांच्यावर झालेल्या प्राणघातक हल्ल्याच्या प्रकरणात आपले नाव विनाकारण घेतले जात असल्याचा निषेध आ. सुरेश धस यांनी नोंदवला आहे.या प्रकरणाशी त्यांचा कोणताही संबंध नसल्याचे स्पष्ट करत त्यांनी गैरजबाबदारपणे लोकप्रतिनिधींवर आरोप करण्याची प्रवृत्ती चुकीची आहे.

हल्ल्याबाबत प्रतिक्रिया देताना आ.धस म्हणाले की, महाविकास आघाडीचे सरकार असतानाही असेच आरोप राम खाडे करत होते. त्यावेळी माझ्यावर एसआयटी मार्फत चौकशी करण्यात आली होती.मात्र सत्य लपून राहत नाही न्यायदेवतेने देखील त्यावेळी माझा कसल्याच प्रकारचा कुठेही संबंध नसल्याचे सांगितले होते. आत्ताही संबंधित राम खाडे यांच्यावर झालेल्या हल्ल्याशी माझा कोणताही संबंध नाही.विनाकारण लोकप्रतिनिधींचे नाव घेऊन बदनाम करण्याचा प्रयत्न योग्य नाही.या प्रकरणी जी काही चौकशी आवश्यक असेल ती संबंधित यंत्रणांनी पूर्णपणे आणि निष्पक्षपणे करावी असेही आ. धस यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

### जालिंदर विद्यालयात विद्यार्थ्याला मारहाण सोशल मीडियावर व्हिडिओ अपलोड

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा पोलीस स्टेशन हद्दीत अल्पवयीनांकडून हिंसक भांडण आणि त्याचे व्हिडिओ सोशल मीडियावर अपलोड करण्याचा प्रकार उघडकीला आला आहे. मा. पोलीस अधीक्षक नवनीत कावत साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली बीड पोलिसांनी अशा कृत्यांवर कठोर कारवाई सुरू केली आहे.



या प्रकरणात, ६ अल्पवयीन मुलांना ताब्यात घेण्यात आले आहे, ज्यांनी एका मित्राला मारहाण करून त्याचे कपडे काढले आणि त्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर अपलोड केला. पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. सोशल मीडियावर असे व्हिडिओ व्हायरल होणे ही चिंतेची बाब आहे. पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, असे व्हिडिओ दिसल्यास त्वरित पोलिसांना माहिती द्यावी. पालक आणि शिक्षकांना देखील मुलांवर लक्ष ठेवण्याचे आणि त्यांच्या सोशल मीडिया वापरावर नजर ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# दिल्लीच्या मल्लांना बीडच्या ग्रामीण मल्लांनी लोळविले

## देवदहिफळच्या फडात डोळ्याचे पारणे फेडणाऱ्या लढती!





**दहिफळ येथील कुस्तीच्या फडात दिल्लीचा मोनू सिंग व बलजीत कौर हे दोन मल्ल दाखल झाले होते. मोनू सिंग यास देवदहिफळच्या लखन बडेने चारीमुंड्या चित केले. तर बलजीत कौर या महिला पहिलवानास नाकलगावच्या शेख जौहर याने काही क्षणात पराभूत करत आसमान दाखविले. दिल्लीचे कितीही नावाजलेले मल्ल आले तरी बीडच्या मातीत किती ताकद आहे हे ग्रामीण भागातील तरण्याबांड पोरांनी दाखवून दिले.**

दिंद्रुड । प्रतिनिधी

देवदहिफळ येथील खंडोबा यात्रेत गुरुवारी (दि.२७ रोजी)कुस्तीच्या फडामध्ये तरुण पहेलवानांनी कुस्ती शौकिनांच्या डोळ्याचे पारणे फेडले. एकापेक्षा एक सरस झालेल्या लढतीत मल्लांनी आपले कसब पणाला लावत प्रेक्षकांची मने जिंकली. शेवटची व मानाची कुस्ती हिंगणी येथील विवेक शेंडगे व देवदहिफळच्या सिद्धेश्वर बडे त्याचप्रमाणे परभणीच्या सचिन देशमुख व देवदहिफळच्या लखन बडे या नामांकित पैलवानांमध्ये झाली. मात्र अंधार पडल्यामुळे ही अंतिम लढत थांबवण्याचा निर्णय पंचांनी घेतला. बक्षिसांची रक्कम या चौघांना विभागून देण्यात आली.

धारूर तालुक्यातील देवदहिफळ येथे खंडोबाची मोठी यात्रा भरते. याच पार्श्वभूमीवर यात्रेत भरणारा कुस्त्याचा फड प्रसिद्ध आहे. मराठवाड्यातून नावाजलेले मल्ल या कुस्त्याच्या दंगलीत हजेरी लावतात. आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे, महाराष्ट्र केसरी शिवाजीराव केकान, सपोनि महादेव ढाकणे, पंढरी अर्बनचे चेअरमन सुरेश तिडके आदी मान्यवरांच्या हस्ते श्रीफळ वाढवून यावर्षीच्या फडास सुरुवात करण्यात आली. तरुण मल्लांनी आपापल्या प्रतिस्पर्धी पहेलवानास चारी मुंड्या चित करून हम भी किसीसे कम नही याची प्रचिती प्रेक्षकांना दिली. सर्वच तरुण मल्लांनी कुस्तीचा आखाडा चांगलाच गाजवला. कुस्तीशौकीन प्रेक्षकांनी लाडक्या पहेलवानांना बक्षिसांचा अक्षरशः वर्षाव केला.

माजी जि. प. सदस्य विलासराव बडे, सरपंच श्रीधर बडे, शिवाजीराव बडे, माजी सरपंच श्रीहरी बडे, भागवत तोंडे, विकास बडे आदी स्थानिक प्रतिष्ठित मंडळी उपस्थित होते. एकेकाळी देवदहिफळचा फड गाजविणारे गंगाधर चौरे, हारी गोरे, रामा तिडके, पप्पू कांदे, राजेभाऊ मुंडे, मुरलीधर चौरे, रामेश्वर मुंडे आदी जुनेजाणते पहिलवान फडात आवर्जून उपस्थित होते. दामोधर बडे, राज बडे, सुग्रीव बडे, नवनाथ बडे, विष्णुपंत बडे, राजेभाऊ बडे, गोपाळराव बडे, बबन कांदे, अंगद वड्डे, सुभाष कांबळे, अंगद बडे, खंडू सहजराव, रामराव बडे, पुजारी किर्तीकुमार जगताप यांच्या सह गावकऱ्यांनी सहकार्य केले.

## घाटनांदुर येथे चंपाषष्ठी खंडोबा यात्रेनिमित्त विविध कार्यक्रमासह जंगी कुस्त्या संपन्न

**घाटनांदुर । प्रतिनिधी**

अंबाजोगाई तालुक्यातील घाटनांदुर येथे खंडोबा यात्रेनिमित्त दिनांक २५ नोव्हेंबररोजी संध्याकाळी नऊ वाजता वाघ्या मुरळीचा कार्यक्रम संपन्न झाला व तसेच २६ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता खंडोबाच्या मानाच्या काठीची मिरवणूक वेळी धनगरी पारंपारिक वाद्य, वारू, भक्त ,मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते खंडोबाची महाआरती झाल्याच्या नंतर महाप्रसादाचे अन्नदान शिवाजी सोमनाथ वैद्य यांच्या वतीने करण्यात आले होते.तसेच दुपारी २ वाजता कुस्त्याची दंगल मोठ्या उत्साहात संपन्न झाली व संध्याकाळी आठ वाजता फटाक्याची अतिश बाजी करण्यात आली या कुस्त्यांच्या दंगल मध्ये



मोठ्या संख्येने बाहेरगाहून आलेले पैलवान व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते या कुस्तीच्या मैदानामध्ये ५० रु पासून ते ५ हजार रुपये पर्यंत बक्षीस खंडोबा देवस्थान कमिटी घाटनांदुर यांच्यावतीने देण्यात आले होते या शेवटीच्या कुस्त्याच्या दंगल मध्ये आठ पैलवानानी नाव नोंदवले होते त्यांची लहान मुलांच्या हस्ते चिठ्ठी काढण्यात आली त्यामध्ये दिपक कराड रा रामेश्वर व राजेभाऊ मुंडे रा तळेगाव या दोन पैलवानांची चिठ्ठी द्वारे निवड करण्यात आली होती या शेवटच्या कुस्ती दंगल मध्ये पैलवान दिपक कराड रा.रामेश्वर हे विजेते झाल्यामुळे त्यांना पाच हजार रुपये बक्षीस व सन्मानचिन्ह ट्रॉफी देऊन सन्मान करण्यात आला या सर्व कार्यक्रमाचे नियोजन खंडोबा देवस्थान कमिटी व समाज बांधव घाटनांदूर यांच्या वतीने करण्यात आले होते यावेळी अजित दादा देशमुख, मा. उपसरपंच बाळासाहेब देशमुख, नेताजी देशमुख, तलाठी शिरसाट साहेब,गोविंद भैया देशमुख,सौदागर वैद्य, उत्तम गाडवे,दत्ता काका जाधव,अध्यक्ष गोविंद वैद्य, उपाध्यक्ष गोपाळ गाडवे, सचिव संतोष गाडवे, दिगंबर जाधव,वैजनाथ भैय्या देशमुख ,रणजीत पाटील, बालासाहेब राजमाने, दादा वैद्य, व्यंकटी गाडवे, रामभाऊ वालेकर, प्रताप गीते,नितेश वैद्य, भगीरथ वैद्य , प्रदीप वैद्य,त्रिंबक वैद्य,शरद सरवदे,श्रीमंत वैद्य,व सर्व खंडोबा देवस्थान कमिटी , घाटनांदुर व परिसरातील गावकरी मंडळी, समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पान ६ वरुन...

### न्याय मिळाल्याशिवाय

रश्मी शुक्ला यांच्याशी मी स्वतः बोलणार आहे. तपासात कुठलाही दबाव सहन केला जाणार नाही, असे त्यांनी सांगितले. न्यायप्रक्रियेतील पारदर्शकतेसाठी डॉ. गोऱ्हे यांनी मुंबई पोलिसांना दोन महत्त्वाचे निर्देश दिले- पहिला, तपासाच्या प्रगतीबाबत अधिकृत बुलेटीन दर दोन दिवसांनी पत्रकारांना देण्यात यावे, जेणेकरून अफवा आणि अप्रमाणित माहितीला आळा बसेल. दुसरा, अशा संवेदनशील खटल्यांमध्ये न्यायालयीन सुनावणीदरम्यान पीडितेवरच आरोप केले जातात; म्हणून संपूर्ण सुनावणीचे इन कॅमेरा व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्यासाठी न्यायालयात विनंती करण्यात यावी, असे निर्देश त्यांनी दिले. तसेच जवळील गावातील एका पॉक्सो प्रकरणातील तक्रार नोंदवण्यात उशीर झाल्याबाबतही त्यांनी संबंधित पोलीस अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली. महिलांविरुद्ध होणाऱ्या गुन्ह्यांच्या तक्रारींची त्वरित आणि गांभीर्याने नोंद होणे आवश्यक आहे. गावांमध्ये पॉक्सो कायद्याबाबत जागृती वाढवण्यासाठी ग्रामसभा घेणे आवश्यक आहे, असे डॉ. गोऱ्हे म्हणाल्या. पॉक्सो प्रकरणातील पीडित मुली आणि पालकांना तपासाच्या प्रगतीची नियमित माहिती देण्याबाबत भारतीय न्यायसंहितेतील नव्या तरतुदींची माहितीही त्यांनी दिली.

### ना.अजितदादा पवार

पवार यांच्यासह विविध मान्यवर यावेळी उपस्थित राहणार असून या जाहिर सभेस बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आ. विजयसिंह पंडित, डॉ.ज्योतीताई मेटे, अनिलदादा जगताप, खमरूल इमान यांच्यासह कल्याणराव आखाडे, दिलीप गोरे, शेख मुजीब, अमर नाईकवाडे, फारुक पटेल, बळीराम गवते, अशफाक इनामदार, झुंजार धांडे, शेख निजाम, भिमराव वाघचौरे, विनोद मुळूक, बाळासाहेब गुंजाळ, रामसिंग टाक, विनोद हातागळे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस-शिवेसना-शिवसंग्राम-सपा आणि मित्रपक्षाच्या कार्यकर्त्यानी उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

### महायुतीच्या उमेदवारांच्या

आज शुक्रवारी सकाळी आठ वाजल्यापासून प्रभाग क्रमांक सहा मधून या दौऱ्याला सुरुवात झाली. यावेळी त्यांच्या समवेत नगराध्यक्षपदाच्या उमेदवार सौ .पद्मश्रीताई धर्माधिकारी यांच्यासह या प्रभागातील उमेदवार बनसोडे अंजली केशवराव, शिंदे व्यंकटेश बाबुराव यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. सौ. राजश्रीताई धनंजय मुंडे यांची परळी शहरातील नागरिकांशी घट्ट नाळ जोडलेली असून त्यांचा मोठा जनसंपर्क आहे याची प्रचिती या दौऱ्यातही बघायला मिळाली. या आधीही त्यांनी लोकसभा, विधानसभा निवडणुकीत सक्रिय सहभाग घेत प्रचाराचा झंझावात निर्माण केला होता. त्याच पद्धतीने नगरपरिषदेवर महायुतीचा झेंडा फडकवण्यासाठीही सौ.राजश्रीताई धनंजय मुंडे स्वतः मैदानात उतरल्या आहेत.यावेळी नागरिकांच्या गाठीभेटी घेत परळी नगर परिषदेत नगराध्यक्ष पदाला व सर्व नगरसेवक पदाला महायुतीच्या उमेदवारांना प्रचंड मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन केले. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, परळी वैजनाथ शहर महायुतीच्या बाजूने कायमच राहिले आहे. आमच्यावर लोकांनी प्रचंड प्रेम केलेले आहे. साहेब व ताई यांच्या बाजूनेच आजचेही वातावरण आहे. त्यामुळे येथे विकासावरच मतदान होईल.साहेबांवर लोकांचे प्रेम आहे कारण जसं साहेबांना कळतंय तसं साहेबांनी परळीचा विकास, विकास आणि विकासाच केलेला आहे. त्यामुळे या निवडणुकीत महायुतीचे नगराध्यक्षपदासह सर्वच्या सर्व उमेदवार मोठ्या मताधिक्याने निवडून येतील. साहेब व ताई या दोघांच्या पाठीशी परळी नक्की आपल्या आशीर्वाद उभे करणार याची आपल्याला खात्री आहे. तमाम परळीकरांनी महायुतीच्या सर्व उमेदवारांना प्रचंड मताधिक्याने विजयी करावे, विकासाला आम्ही कुठेही कमी पडणार नाही अशी ग्वाही सौ .राजश्रीताई मुंडे यांनी यावेळी दिली.

### नरेगा वर्ककोड डिलीट

आदेशीत केले आहे. तसेच गटविकास अधिकारी श्री.राठोड साहेब यांनी लाभार्थ्यांना महत्त्वाची सूचना दिली आहे. कामांच्या पुनर्मंजुरीसाठी (दुबार वर्क कोड) मूळ संचिका व चालू तारखेचा ७/१२ उतारा घेऊन तातडीने पंचायत समिती कार्यालयाशी संपर्क साधावा, असे त्यांनी आवाहन केले.राजुरी नवगण व कामखेडा गणातील सर्व गावांना वर्क कोड डिलीट होण्याचा मोठ्या प्रमाणात फटका बसला असून पुनर्मंजुरी प्रक्रिया सुरू आहे. त्याचबरोबर मजुरांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी मस्टर तात्काळ सुरू करण्याची मागणी निवेदनात स्पष्टपणे करण्यात आली. लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रे लवकरात लवकर जमा करून प्रक्रिया पूर्ण करावी, असे प्रशासनाकडून कळविण्यात आले आहे.

### जिल्ह्याबाहेरही ऊस

जास्त सरासरी रिकव्हरी लागत आहे. शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च लक्षात घेता प्रती टन ३ हजार रू. पहिली उचल तर ४ हजार रु. अंतिम दर मिळाला पाहीजे ही मागणी निवेदने करून केली. याबाबत जिल्हाधिकारी, बीड व साखर सहसंचालक छ. संभाजीनगर विभाग यांना देखील कळवण्यात आले आहे.

ऊस उत्पादक संयुक्त कृती समितीने सुरू केलेल्या या आंदोलनास विविध ऊस तोड कामगार संघटना, विविध गावातील ग्राम पंचायत, सेवा सहकारी सोसायटी यांनी ठराव मंजूर करत पाठिंबा दिला असून ऊस प्रश्नी पेटलेले हे आंदोलनाबाबत साखर कारखानदारांनी सकारात्मक प्रतिसाद न दिल्यास हे आंदोलन यापेक्षा अधिक तीव्र स्वरूप घेऊन जन आंदोलन होईल असे कृती समितीकडून सांगण्यात येत आहे.

### तपेनिमगाव येथे दहा

बाबासाहेब जयसिंग काळे यांच्या तक्रारीवरून तलवाडा पोलिस ठाण्यात २५ नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बाबासाहेब जयसिंग काळे यांनी गुन्हा का दाखल केला म्हणून जिवे मारण्याची धमकी दिल्या प्रकरणी बाबासाहेब काळे यांनी सांगितले की माझ्या कुटुंबाला जीवाला धोका आहे तलवाडा पोलीस स्टेशन येथे अर्ज दाखल केला आहे.

## संविधानामुळे भारतीय लोकशाही मजबूत झाली -अॅड.मस्के

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालय वसंत दादा पाटील महाविद्यालय राज्यशास्त्र विभाग राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले



या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ सदाशिव सरकटे उद्घाटक म्हणून प्राचार्य डॉ विश्वास कदम प्रमुख पाहुणे म्हणून वसंत दादा पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ बळीराम राख संविधान आणि डॉ बाबासाहेबांची योगदान या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी अँड विशाल मस्के विद्यापीठ सिनेट सदस्य प्राध्यापक सौ कल्पना घारगे माजी प्राचार्य सोमनाथ घाडगे कनिष्ठ विभाग प्राध्यापक सतीश जरागे वसंत दादा पाटील महाविद्यालय राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ उमाकांत वानखेडे प्राध्यापक पवार सर उपस्थित होते सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून संविधानाच्या उद्देश पत्रिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले मान्यवरांचा सत्कार करून या कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्राध्यापक डॉ उमाकांत वानखेडे यांनी केले तर संविधान आणि बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान या विषयावर विशाल मस्के यांनी आपले मनोगत व्यक्त करताना संविधानामुळे भारतीय लोकशाही मजबूत झाली असून संविधाने लोकशाहीचे सामर्थ्य आहे असे गौरव उद्गार काढले माझी प्राचार्य प्राध्यापक सोमनाथ घाडगे सर महाविद्यालयाचे समन्वय प्राचार्य डॉक्टर सुनील जाधव सर यांनी मार्गदर्शन केले विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या राज्यघटनेवरील भितीपत्रकाची मोचन करण्यात आले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विभाग प्रमुख डॉक्टर लोखंडे बी बी यांनी केले आभार प्राध्यापक नारायण फुने यांनी मानले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ शिवाजीराव काकडे प्राध्यापक डॉ जाहीद सिद्दिकी प्राध्यापक पापाजी चव्हाण प्राध्यापक आनंद भगत प्राध्यापक बजरंग दिसले यांनी सहकार्य केले राज्यशास्त्र विभागाच्या वतीने संविधान दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले या प्रश्नमंजुषा निबंध स्पर्धा संविधान जनजागृती रॅली उद्देश पत्रिकेचे वाटप गटचर्चा सेमिनार इत्यादीचे आयोजन करण्यात आले.

## शिरूर कासार तालुक्यातील मुलींसाठी शासकीय वसतिगृहाच्या बांधकामास प्रशासकीय मान्यता

**शिरूर कासार । प्रतिनिधी**

शिरूर कासार तालुक्यातील स्थलांतरित ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींसाठी संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह योजना अंतर्गत शासकीय वसतिगृहाच्या बांधकाम अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळवून देण्याच्या माझ्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला आज यश मिळाले आहे.

मौजे वारणी, गट क्रमांक २५९ येथे मुलांच्या वसतिगृहासह मुलींचे वसतिगृह उभारण्याची आवश्यकता तातडीची असून, त्यासाठी मी मा. सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण विभाग, बीड यांना सविस्तर माहिती देऊन अधिकृत पत्राद्वारे मागणी सादर केली होती. ऊसतोड कामगारांच्या कुटुंबांचे मोठ्या प्रमाणावर बाहेर पडणारे स्थलांतर व परिसरातील आयडियल इंग्लिश स्कूल, मॉडर्न इंग्लिश स्कूल, केशवराज माध्यमिक विद्यालय, राजीव गांधी महाविद्यालय, संत वामनभाऊ विद्यालय, शासकीय खढख यांसारख्या महत्वाच्या शैक्षणिक संस्था लक्षात घेता या वसतिगृहाची गरज मी सातत्याने शासनापर्यंत पोहोचवत होतो. आज महाराष्ट्र शासन - सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने १३.७९ कोटी किंमतीच्या बांधकाम अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता दिली आहे, ही अत्यंत समाधानाची आणि ऊसतोड कामगारांच्या मुलींसाठी ऐतिहासिक बाब आहे.

या प्रकल्पात - २३९३.०५ चौरस मी. बांधकाम क्षेत्र - तीन मजली इमारत - पाणीपुरवठा, स्वच्छतागृह, विद्युत व्यवस्था - सोलार रूफटॉप, रेन वॉटर हार्वेस्टिंग - आवश्यक फर्निचर व मूलभूत सुविधा

- परिसर विकास, अंतर्गत रस्ते, बगीचा, ड्रेनेज व्यवस्था - तांत्रिक मान्यता, पर्यावरण मार्गदर्शक तत्वांची पूर्ण पूर्तता अशा सर्व घटकांचा समावेश असून हा प्रकल्प पूर्णपणे शासन नियमावलीनुसार राबविण्यात येणार आहे. ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींचे शिक्षण अबाधित राहावे, त्यांना सुरक्षित व गुणवत्तायुक्त निवास सुविधा मिळाव्यात यासाठी मी सुरुवातीपासून कटिबद्ध आहे. शिरूर कासार तालुक्यातील मुलींसाठी हे वसतिगृह म्हणजे शिक्षणाच्या संधींची नवी दिशा ठरणार आहे. हा निर्णय ऊसतोड कामगारांच्या कुटुंबांसाठी मोठा दिलासा व समाजकल्याणाच्या दिशेने महत्वाची पायरी आहे.

## प.पु.मॉ.कनकेश्वर देवीच्या वाणीमध्ये भव्य शिवमहापुराण कथेचे आयोजन



माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव येथील श्री.सदगुरु सत्संग गोसेवा समितीच्या वतीने

कौशल्याबाई बजाज मैदान, बायपास रोड माजलगाव येथे श्री शिवमहापुरान कथेचे आयोजन करण्यात आले आहे.

श्री प्रसिद्ध शिवपुराण कथाकार श्री.श्री. १००८प.पु.मॉ.कनकेश्वरी देवीजी यांच्या वाणीतुन ८ डिसेंबर ते १६ डिसेंबर या दरम्यान होणार आहे. काल दि-२८ नोव्हेंबर गुरूवार रोजी या शिवमहापुराण कथा चा भव्य मंडप स्तंभाच्या कामाचे पुजान जेष्ठ नागरिक व कथेचे यजमान यांच्या शुभ हस्ते श्रीफळ फोडून करण्यात आले. या कार्यक्रमास मराठवाड्यातीलच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातुन भक्त शिवमहापुरन कथा श्रवणासाठी येणार आहेत.या भक्तांची विशेष व्यवस्था करण्यात येणार आहे. या शिवमहापुराण मुख्य यजमान जुगलकिशोरजी लड्डा हे आहेत. संपूर्ण माजलगाव येथील संपूर्ण राजस्थानी परिवार,शिवभक्त व गोसेवक या कथेचे नियोजन करनार आहेत. तर या कथेच्या महाप्रसादाचे मुख्य यजमान गोविंद करवा व परिवाराच्या वतीने करण्यात येणार आहे. या कथा श्रवणाचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्री.सदगुरु सत्संग गोसेवा समितीच्या वतीने करण्यात आले आहे या समितीने अध्यक्ष राधेश्याम लोहिया आहेत.

## ऊस दरवाढीची मागणी मान्य करावी- संरपच मयुर आंधळे

### रूई पिंपळा ग्रामपंचायतचा युवा संघर्ष समितीच्या ऊस दरवाढ आंदोलनाला पाठिंबा

वडवणी । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात युवा शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने ऊस दरवाढीच्या मागणी संदर्भात जगदीश फरताडे व संजय आंधळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या आंदोलनाला सरपंच मयूर आंधळे यांनी रूई (पिंपळा) ग्रामपंचायत ने बहुमताने ठराव पास करून पाठिंबा जाहीर केला आहे तसे लेखी निवेदन वडवणी तहसीलदारामार्फत राज्याचे सहकार मंत्री,जिल्ह्याचे पालकमंत्री यांना दिले आहे.



वडवणी तालुक्यातील मौजे रूई (पिंपळा) ग्रामपंचायतच्या वतीने ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी ऊस दरवाढीसाठी युवा शेतकरी संघर्ष समितीचे सुरू असलेल्या आंदोलनाला जाहीर पाठिंबा दिला आहे.सध्याच्या स्थितीत ऊस उत्पादनाचा खर्च अत्यंत वाढलेला आहे रक्ताच पाणी करून,कर्ज काढून पिकवलेल्या ऊसाला कारखानदाराकडून कोणत्याही दरजाहीर करण्यात आलेला नाही याचा तीव्र निषेध रूई- पिंपळा ग्रामपंचायत करत आहे युवा शेतकरी संघर्ष समितीने मांडलेल्या ऊसाला पहिला हप्ता ३००० रुपये व अंतिम बिल ४००० रुपये या न्याय मागणीचे समर्थन करत आहे.वरील मागणीचा समाधानकारक तोडगा निघत नाही तोपर्यंत ऊसतोड बंद,कोयता बंद,ऊस वाहतूक बंद,क्रिशिंग बंद या आंदोलनाच्या कृतीस आम्ही पाठिंबा देत आहेत व रुई (पिंपळा) ग्रामपंचायतच्या हद्दीत आणि गावातील शिवारात चालू असलेल्या ऊसतोड कामगारांना ऊस बागायतदारांना ऊस वाहन मालकांना सदर बंद मध्ये सहभागी व्हावे असे आवाहन ही करण्यात आले आहे ऊसाचा दर जाहीर होत नाही म्हणून शेतकऱ्यांच्या भावना अत्यंत तीव्र झाल्या असून सदर मागण्यावर तोडगा न निघाल्यास कायदा,सुव्यवस्था व परिस्थिती बिघडण्याची शक्यता निर्माण होत आहे त्यामुळे आपण गंभीर व अत्यंत तातडीच्याप्रश्नावर त्वरित मध्यस्थी करून शेतकऱ्यांच्या न्याय मागणीचा तोडगा काढावा असे निवेदन सरपंच मयूर आंधळे यांनी बुधवार दि.२६ नोव्हेंबर २०२५ रोजी वडवणी तहसीलदार यांना दिले आहे. यावेळी रुई (पिंपळ) येथील ऊस उत्पादक शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

cmyk

# राज्यात थंडीची लाट येणार!

## पुढील सहा दिवस कसं असेल हवामान?

राज्यातील वातावरणात सातत्याने बदल होत आहे. सध्या राज्याच्या बहुतांश भागात थंडीचा जोर वाढल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. वाढत्या थंडीमुळं ठिकठिकाणी शेकोट्या पेटल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. उद्या काही भागात थंडीच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. दरम्यान, सध्या थंडीची लाट कुठे कुठे आहे. तसेच पुढील सहा दिवस राज्यातील वातावरण कसं राहणार याबाबतची सविस्तर माहिती ज्येष्ठ हवामान अभ्यासक माणिकराव खुळे यांनी दिली आहे.

सध्या महाराष्ट्रात जाणवत असलेली थंडी, आजपासुन पुढील सहा दिवस म्हणजे शुक्रवार २१ नोव्हेंबर (मार्गशीर्ष प्रतिपदा) पर्यंत अशीच जाणवणार असुन पुढील ३ दिवस परवा मंगळवार दिनांक १८ नोव्हेंबर पर्यन्त थंडीत काहीशी वाढ होण्याची शक्यता जाणवते. शनिवार दिनांक २२ नोव्हेंबर पासुन सध्यापेक्षा थंडी केवळ काहीशी कमी होण्याची शक्यता जाणवते.

जेऊरला पुन्हा थंडीची लाट करमाळा तालुक्यातील जेऊरलाला आज पहाटे पाच वाजता ९ अंश से. इतके किमान तापमान नोंदवले आहे. सरासरीपेक्षा ५.५ इतक्या अंश से. ने ते खालावून तेथे व लगतच्या परिसरात थंडीची लाट जाणवत आहे.



थंडीचे सातत्य टिकून महाराष्ट्रातील डहाणू जळगांव नंदुरबार नाशिक मालेगाव अहिल्यानगर पुणे सांगली सातारा छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, बीड, नांदेड, परभणी ह्या शहरात व संपूर्ण विदर्भातील शहरात व लगतच्या परिसरात पहाटेच्या ५ च्या किमान तापमानाचा पारा सरासरीच्या ४ ते ५ डिग्रीने खालावून तेथे आजही चांगलीच थंडी जाणवली असुन थंडीचे सातत्य टिकून आहे.

दिवसाही जाणवतोय गारवा : मालेगांव( जि. नाशिक ) जळगांव बीड नांदेड वाशिम येथे दुपारी ३ चे कमाल तापमान सरासरीपेक्षा ३ डिग्रीच्या आसपास खालवले असल्यामुळे तेथे व लगतच्या परिसरात रात्री बरोबर दिवसाही काहीसा गारवा जाणवत आहे.

शेती पिकांना थंडीचा फायदा : गेल्या ८ ते १० दिवसापासून म्हणजे ८ नोव्हेंबर पासून जाणवत असलेल्या माफक थंडीमुळे महाराष्ट्रातील सध्याचे बाल्यावस्थेतील रब्बीची शेतपिके, फळ-बागा व इतर भाजीपाला पिकांना मदतच होवु शकते. त्यामुळं सुरुवातीच्या प्राथमिक अवस्थेतील ह्या वर्षीच्या रब्बी हंगामातील पिकांसाठी ही जमेचीच बाजू समजावी, असे वाटते.

उद्या काही भागात थंडीच्या लाटेचा इशारा : दरम्यान, हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार, राज्यात उद्या काही भागात थंडीच्या लाटेचा इशारा उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाडा गारठणार असल्याची माहिती हवामान विभागानं दिली आहे. दोन्ही भागांत किमान सरासरीपेक्षा कमी तापमान राहण्याचा अंदाज आहे. उत्तर महाराष्ट्रात धुळे, नंदुरबार, जळगाव, आणि नाशिकातील काही भागांत किमान तापमान सरासरीपेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, हिंगोली आणि नांदेडात देखील तापमान सरासरीपेक्षा कमी राहण्याचा अंदाज आहे.

## घरच्या घरी तयार करा निंबोळी अर्क

रासायनिक कीटकनाशकांच्या अतिरेकी वापरामुळे पिकांचे नुकसान, मातीच्या गुणवत्तेचा ऱ्हास, मानवी आरोग्यावर दुष्परिणाम आणि पर्यावरणीय संकटे या समस्या गंभीर बनल्या आहेत. यावर एक नैसर्गिक, प्रभावी व किफायतशीर उपाय म्हणजे निंबोळी अर्क. हे किटकनाशक घरच्या घरी तयार करता येते, तेही कोणताही अतिरिक्त खर्च न करता.




निंबोळी अर्क म्हणजे काय? : कडूनिंबाच्या पिकलेल्या फळांपासून तयार होणारा हा अर्क मावा, तुडतुडे, अमेरिकन बोंडअळी, पाने पोखरणारी व देठ कुरतडणारी अळी, फळमाशी, खोडकीडा इत्यादी किडींवर अत्यंत प्रभावी आहे. ५% प्रमाणात फवारणी केल्यास हे किड नियंत्रण सुनिश्चित करता येते.

घरच्या घरी निंबोळी अर्क तयार करण्याची पद्धत : बांधावर किंवा रस्त्याच्या कडेला पडलेल्या पिकलेल्या निंबोळ्या गोळा करा. त्यातील साल व गर काढून फक्त बिया स्वच्छ धुवून सावलीत वाळवा. कोरड्या ठिकाणी साठवून ठेवा. या बिया खलबत्यात किंवा पल्वरायझरमध्ये बारीक करून ५ किलो पावडर तयार करा. ती ९ लिटर पाण्यात भिजवा. दुसऱ्या भांड्यात १ लिटर पाण्यात २०० ग्रॅम साबणाचा चुरा भिजत ठेवा.दुसऱ्या दिवशी निंबोळी अर्क कपड्यातून गाळा. त्यात साबणाचे द्रावण मिसळा. हे मिश्रण ९० लिटर पाण्यात मिसळून १०० लिटर फवारणीयोग्य द्रावण तयार करा.

फायदे : प्रभावी कीड नियंत्रण. अत्यल्प खर्च. सहज उपलब्ध व घरच्या घरी तयार करता येणारा उपाय. पर्यावरणपूरक आणि निसर्गाशी सुसंगत. उत्पादन खर्चात बचत, नफ्यात वाढ. निंबोळी अर्क फवारणीच्या दिवशीच तयार करावा. बाजारातील दर्जाहीन सेंद्रिय किटकनाशकांपेक्षा घरचा अर्क अधिक प्रभावी व सुरक्षित ठरतो. स्वतःच्या शेतात निंबोळी अर्क वापरून कीड नियंत्रण करा, पर्यावरणाचे रक्षण करा आणि शाश्वत शेतीचा मार्ग स्वीकारा.

## संत्रा कलमांची निवड कशी करावी?

संत्रा कलमांची लागवड पावसाळा सुरू होताना करणे उत्तम असते. एक पाऊस पडून गेल्यानंतर आणि पुढे ढगाळ हवामानाचा काळ सुरू झाल्यानंतर संत्रा कलमांची लागवड करावी.पावसाळा संपताना किंवा संपून गेल्यानंतर लागवड करणे टाळावे. त्या दृष्टीने मध्य जुलैपर्यंतचा काळ लागवडीसाठी चांगला असतो.योग्य खुंट व योग्य प्रकारचा डोळा यांच्या खात्रीसाठी कलमे कृषी विद्यापीठ, शासकीय परवानाधारक रोपवाटिकेतूनच घ्याव्यात, कलमे निरोगी, जास्त उत्पादन व दर्जेदार फळे देणाऱ्या मातृ वृक्षाचे डोळे वापरूनच तयार केलेली असावीत, संत्र्याच्या कलमा किकरपानी, वेलिया किंवा पानसोट असलेल्या मातृ वृक्षापासून तयार केलेली नसावीत, कलमांची निवड करताना संत्र्याचा डोळा कोणत्या खुंटावर बांधलेला आहे हे पाहावे. कारण खुंटाचा, झाडाची शारीरिक वाढ, फळधारणाशक्ती, फळांचे गुणधर्म आणि झाडाचे आयुष्य यावर परिणाम पडत असतो,कलमे रोगप्रतिकारक्षम खुंटावर तयार केलेली असावीत, हलक्या व मध्यम जमिनीसाठी जंबेरी तर भारी जमिनीसाठी रंगपूर लिंबू या खुंटावरील कलमांची निवड करावी, जबेरी किंवा रंगपूर लिंबू या खुंटावर २५ ते ३० सेंमी उंचीवर बांधलेल्या कलमा निवडाव्यात. कमी उंचीवर बांधणी केलेल्या कलमा मातीच्या आणि पाण्याच्या संपर्कात येऊन बुरशीजन्य रोगास बळी पडतात, कलमांचे फाटे



परिपक्व झालेले असणे आवश्यक आहे. फाट्यावर पांढऱ्या बारीक रेषा असल्या तर फाटे परिपक्व झाले असे समजावे, साधारण ४५ ते ६० सेंमीपर्यंत सरळ वाढलेल्या कलमा चांगल्या असतात. अति उंच कलमा लागवडीसाठी वापरू नयेत. त्या कलमा वेलीया प्रकारच्या असण्याची शक्यता असते, कलमांवर पाने पोखरणारी किंवा पाने खाणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव नसावा. तसेच कलम रोगमुक्त असावे, जुन्या झालेल्या खुंटावरील कलमे लागवडीस योग्य नसतात. साधारणतः एक वर्षे वयाची कलम लागवडीसाठी निवडावी, कलमांना भरपूर मुळे (जाळवा) असावीत. कलमांच्या खोडावर इतर फूट नसावी, डोळ्यांचा सांधा चांगला भरलेला, जखम व व्रणरहित असावा.

## द्राक्ष उत्पादनात प्रकाशाची भूमिका

सूर्यप्रकाशाची गुणवत्ता विशेषत: त्याची तीव्रता आणि वर्णपट (स्पेक्ट्रम) हे द्राक्षाच्या वाढीमध्ये आणि बेरीच्या गुणवत्तेत महत्त्वाची भूमिका बजावते. त्याचा द्राक्षांमधील साखर आणि आम्लतेच्या संतुलनावरही परिणाम होतो. अपरिपक्व द्राक्षांमध्ये आढळणाऱ्या प्रमुख मॅलिक ॲसिडचे उत्पादनास सूर्यप्रकाश उत्तेजित करतो. जसजशी द्राक्षे पिकत जातात आणि अधिक सूर्यप्रकाश मिळत जातो, तसतसे मॅलिक ॲसिडचे हळूहळू टार्टरिक आम्लामध्ये रूपांतर होते. त्यामुळे आम्लता वाढते. द्राक्ष वेलींचा वाढीचा वेग हा आपल्या हवामानामध्ये ८००ते १२०० पीपीएफडी प्रकाशाच्या तीव्रतेमध्ये राहतो. प्रामुख्याने 'थॉमसन सीडलेस' या वाणामध्ये २५ पीपीएफडी प्रकाशाची तीव्रता प्रकाश भरपाई बिंदू म्हणून ओळखली जाते. (पीपीएफडी : पानावर पडणाऱ्या प्रकाश संश्लेषणयोग्य अशा फोटॉनची संख्या प्रति सेकंद प्रति वर्गमीटर कॅनॉपी.) दाट कॅनॉपीमध्ये पुरेसा सूर्यप्रकाश आत पोहोचत नाही. अशा सावलीतील पानांमधील प्रकाश संश्लेषणाचा दर हा २५ ते ५० टक्क्यांनी कमी असल्याचे अभ्यासात आढळले आहे. पानांची कार्यक्षमता वाढवण्यासाठी वेलीचे कॅनॉपी व्यवस्थापन योग्य पद्धतीने करणे आवश्यक आहे.



सूर्यप्रकाश आणि वातावरण परस्पर संबंध –

प्रकाश, तापमान आणि आर्द्रता हे वातावरणातील घटक द्राक्षाच्या शरीरशास्त्रीय हालचालींवर प्रभाव टाकतात. मुख्य शरीरशास्त्रीय हालचालींपैकी तापमानातील फरकांमुळे थेट प्रभावित होणारी प्रकाश संश्लेषण ही पहिली प्रक्रिया आहे. जेव्हा तापमान अनुकूल मर्यादेपेक्षा जास्त वाढते किंवा कमी होते, तेव्हा द्राक्ष वाणांमध्ये खालील लक्षणे दिसतात.

प्रकाश संश्लेषण क्रियेसाठी २५ ते ३५ अंश सेल्सिअस दरम्यान तापमान अनुकूल मानले जाते. जेव्हा तापमान १० अंशांपेक्षा खाली जाते, तेव्हा बहुतेक शरीरशास्त्रीय हालचालींचा वेग मंदावतो. कमी तापमानामुळे सामान्यतः बेरीमधील सामू आणि प्रोलिनचे प्रमाण कमी होऊन आम्लतेचे प्रमाण वाढते. ४० अंशांपेक्षा जास्त तापमानात वेलीतील उष्णतेची अनुकूलता यंत्रणा सक्रिय होते. उच्च तापमान हे अँथोसायनीन संयुगांच्या निर्मितीस प्रतिबंध करते. अँथोसायनीनची रचनासुद्धा बदलू शकते. क्रिमसन सीडलेस जातीमध्ये अनेकदा समाधानकारक लाल रंग न येण्यामध्ये रात्रीच्या उच्च तापमानामुळे अँथोसायनीनचे संचय कमी होणे हे मुख्य कारण दिसते. तसेच साखर जमा होण्यास अडथळा निर्माण होतो. तापमानातील वाढीच्या स्थितीमध्ये परिस्थितीनुसार सिंचनाचे नियोजन करून वातावरणातील तापमानापेक्षा पानांचे तापमान ३ ते ४ अंशांनी कमी करता आल्यास अन्ननिर्मितीचा वेग वाढू शकतो. बहुतांश जाती या प्रकाश आणि तापमानाला वेगवेगळा प्रतिसाद देतात. त्यांच्यातील आनुवंशिक घटक प्रकाशाची तरंग लांबी आणि तापमानातील बदलाप्रमाणे सक्रिय किंवा निष्क्रिय होतात. प्रकाश पानांद्वारे शोषून घेण्यासाठी वेलींच्या पानांत ७५ ते ८० टक्के आर्द्रता आवश्यक असते. अशी आर्द्रता असलेल्या पानांमध्ये रासायनिक प्रक्रिया चांगली होते. द्राक्ष हे ३ प्रजातीतील वेल आहे. द्राक्षाच्या पानांवरील अभ्यासातून असे स्पष्टपणे दिसते, की ४० अंश सेल्सिअसपेक्षा जास्त तापमानात प्रकाश संश्लेषणाचा वेग लक्षणीय प्रमाणात कमी होतो. या कमी झालेल्या दरामुळे जैवरासायनिक प्रक्रिया विस्कळीत होतात. पानांतील हरितद्रव्यांचे प्रमाण कमी होऊन पाने पिवळी पडतात. ठरावीक तापमानाच्या वर वेलाची पाने त्यांची पर्णरंध्रे बंद करून बाष्पोत्सर्जन कमी किंवा बंद करतात, त्यामुळे पानांतील पाण्याची अपेक्षित पातळी (टर्गर) टिकून राहते.

तापमानाचा द्राक्ष मण्यावर होणारा परिणाम –

मण्यामध्ये मुख्यतः पाणी, शर्करा, सेंद्रिय आम्ल, नायट्रोजन संयुगे, खनिजे, पेक्टिन्स, फिनोलिक संयुगे आणि सुगंधी संयुगे असे विविध घटक आढळतात. त्यावर कमी जास्त होणाऱ्या तापमानाचा परिणाम होतो. मण्याचे चयापचय सभोवतालच्या तापमानावर अवलंबून असते. तापमानात वाढ झाल्यामुळे आम्लता कमी होते आणि साखरेचे प्रमाण वाढते. त्याचा साखर-आम्ल गुणोत्तरावर देखील परिणाम होतो. उच्च तापमानामुळे मॅलिक ॲसिडचे चयापचय देखील टार्टरिक आम्लापेक्षा वेगाने होते. मॅलेट संचयनासाठी अनुकूल तापमान २० ते २५ अंश सेल्सिअस असून, तापमान ४० अंशांवर गेल्यास त्यात घट दिसून येते. जेव्हा दिवसाचे तापमान तुलनेने जास्त असते, तेव्हा मण्यामधील सामू कमी राखण्यासाठी रात्रीचे तापमान कमी असणे आवश्यक असते. जेव्हा तापमान ३० अंशांपेक्षा जास्त असेल, तेव्हा अँथोसायनिन निर्मितीमध्ये घट दिसून येते.

महत्त्वाच्या बाबी –

रसायनाच्या फवारणीदरम्यान स्टिकर्सचा वापर कमी करावा. म्हणजे पानांच्या पृष्ठभागावर त्यांचा लेप तयार होणार नाही. पानांवर सूर्यप्रकाश व्यवस्थितरीत्या विभागला जाऊन प्रकाशसंश्लेषण क्रिया सुरळीत पार पडेल. पानावर पुरेशा प्रमाणात सूर्यप्रकाश पडल्यामुळे कीड-रोगांचा प्रादुर्भाव तुलनेने कमी होईल. कीड-रोगांच्या प्रादुर्भावामुळे पानांचे क्षेत्रफळ कमी होऊन प्रकाश संश्लेषण क्रियेत अडथळा येऊ शकतो. प्रकाश संश्लेषण क्रिया सुरळीत पार पडण्यासाठी दोन फांद्यामध्ये योग्य अंतर ठेवावे. अतिरिक्त फांद्यांची छाटणी करावी. प्रत्येक फांदीवर फक्त १७ ते १८ पाने ठेवावीत. प्रत्येक भागात सारख्या तरंगलांबीचा सूर्यप्रकाश मिळेल. तसेच फवारणीचे कव्हरेज पूर्ण कॅनॉपीमध्ये होऊ शकेल.

सूर्यप्रकाशाच्या दिशेने असलेल्या कळीमध्ये फळधारणा योग्यप्रकारे होते. योग्य घड निर्मितीसाठी किमान ३० टक्के सूर्यप्रकाश कॅनॉपीमधून जाणे आवश्यक आहे. सावलीमध्ये घड निर्मिती योग्य प्रकारे होत नाही. संजीवकांचा वापर योग्य प्रमाणात करावा. संजीवकांच्या जास्त वापरामुळे पाने कडक होतात आणि फाटतात, त्यामुळे पाने पूर्ण क्षमतेने अन्ननिर्मिती करू शकत नाहीत. काडीवरील प्रत्येक डोळ्यावर एकसारख्या तीव्रतेचा सूर्यप्रकाश मिळाला तरच सूक्ष्मघड निर्मिती होते. दाट कॅनॉपी किंवा ढगाळ वातावरण यामुळे डोळ्यावर सूर्यप्रकाश न मिळाल्यास त्या डोळ्यातील प्रथिनांचे उत्पादन न झाल्याने सूक्ष्मघडाऐवजी त्याचे बाळीमध्ये रूपांतर होते. मंडप पद्धतीमध्ये फांद्या आडव्या वाढत असल्यामुळे सूर्यप्रकाशाची ऊर्जा कमी कार्यक्षमतेने वापरली जाते. त्यात दाट कॅनॉपीमुळे सूर्यप्रकाश पानांच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या थरांना व्यवस्थित मिळत नाही. खालच्या थरातील पाने पोषक घटकांसाठी अन्य पानांवर अवलंबून राहतात. सूर्यप्रकाशाच्या योग्य वापरासाठी ट्रेलीस वळण पद्धतीचा अवलंब करावा.




### महत्वाच्या घटना

१५६१ : मुघल बादशाहा अकबर यांनी मालवा प्रांताची राजधानी 'सारंगपूर' येथे हल्ला करून तेथील सुलतान बाजबहादूर यांचा पराभव केला.
१८४९ : ब्रिटीश ईस्ट ईंडिया कंपनीने पंजाब खालसा केले.
१८४९ : ब्रिटिश साम्राज्याने पंजाब ताब्यात घेतले.
१८५७ : क्रांतिकारक मंगल पांडे यांनी बराकपूरच्या छावणीमध्ये ब्रिटिश अधिकाऱ्यांवर गोळ्या झाडल्या व इथूनच १८५७ च्या स्वातंत्र्यसंग्रामाला खरी सुरुवात झाली.
१८५७ : बेंगाल नेटिव्ह इन्फंट्रीच्या ३४ व्या तुकडीतील शिपाई मंगल पांडे याने इस्ट इंडिया कंपनीतील ब्रिटिश अधिकाऱ्यांवर गोळ्या झाडल्या. या घटनेतुनच १८५७ च्या राष्ट्रीय उठावाची सुरूवात झाली.
१९३० : 'प्रभात'चा 'खूनी खंजिर' हा चित्रपट मुंबईत प्रदर्शित झाला.
१९४२ : क्रिप्स योजना जाहीर
१९५४ : भारत सरकारच्या कार्मिक मंत्रालया अंतर्गत कार्यरत असलेली संशोधन व प्रशिक्षण संस्था म्हणजेच 'भारतीय लोक प्रशासन संस्था' ची स्थापना करण्यात आली. या संस्थेचे प्रथम अध्यक्ष टी. एन. चतुर्वेदी होते. तसचं, उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडू हे या संस्थेचे विद्यमान अध्यक्ष आहे.
१९६२ : भारताचे तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या हस्ते पिंपरी येथील हिंदुस्थान अँटिबायोटिक्सच्या पेनिसिलिन कारखान्यातील स्ट्रेप्टोमायसिनच्या उत्पादन प्रकल्पाचे अनावरण झाले.
१९६८ : महात्मा फुले कृषी विद्यापीठाची राहुरी येथे स्थापना
१९६९ : भा. द. खरे यांनी लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनावर 'अमृतपुत्र' ही कादंबरी लिहिण्यास प्रारंभ केला.
१९७० : दत्तो वामन पोतदारांने 'शिवचरीत्र' ह्या ग्रंथाच्या लेखनास प्रारंभ केला.
१९७३ : व्हिएतनाम युद्ध व्हिएतनाममधुन शेवटचा अमेरिकन सैनिक बाहेर पडला.
१९८२ : एन. टी. रामाराव यांनी तेलगू देसम पक्षाची स्थापना केली.
२००४ : भारतीय फलंदाज वीरेंद्र सेहवाग याने पाकिस्तान विरुद्ध कसोटी क्रिकेट सामन्यात ३०९ धावांची खेळी केली व त्रिशतक झळकवणारा पहिला भारतीय फलंदाज झाला.
२००४ : आयर्लंड देशाने कामाच्या ठिकाणी धूम्रपान करण्यास बंदी घातली. अश्या प्रकारची बंदी लागू करणारे ते जगातील पहिले राष्ट्र ठरले. २९ मार्च या तारखेपासून सार्वजनिक आरोग्य (तंबाखू) अधिनियमांतर्गत बंद असलेल्या कार्यलयाच्या परिसरात धूम्रपान करणे बेकायदेशीर ठरले आहे.
२०१४ : इंग्लंड आणि वेल्स मध्ये प्रथम समलिंगी विवाह झाले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८६९ : सर एडविन लुटेन्स दिल्लीचे नगररचनाकार (मृत्यू: १ जानेवारी १९४४)
१९१३ : साहित्य अकादमी पुरस्कार विजेता हिंदी भाषिक कवी व लेखक भवानी प्रसाद मिश्रा यांचा जन्मदिन.
१९१८ : वॉलमार्ट चे निर्माते सॅम वॉल्टन यांचा जन्म. (मृत्यू: ५ एप्रिल १९९२)
१९२६ : पांडुरंग लक्ष्मण तथा 'बाळ' गाडगीळ अर्थशास्त्रज्ञ व विनोदी लेखक (मृत्यू: २१ मार्च २०१०)
१९२८ : भारताचे परराष्ट्र सचिव तसेच, दिल्ली, अंदमान आणि निकोबार या केंद्रशाशित प्रदेशाचे माजी उपराज्यपाल. याचप्रमाणे त्रिपुरा, गोवा आणि उत्तर प्रदेश या राज्यांचे माजी राज्यपाल रोमेश भंडारी यांचा जन्मदिन.
१९२९ : उत्पल दत्त रंगभूमी आणि चित्रपट या दोन्ही माध्यमात आपला ठसा उमटवणारे कलाकार (मृत्यू:१९ ऑगस्ट १९९३)
१९३० : अनिरुद्ध जगन्नाथ मॉरिशसचे पंतप्रधान
१९३९ : प्रसिद्ध चित्रपट अभिनेता व हास्यकलाकार सय्यद इश्तियाक अहमद जाफरी उर्फ जगदीप यांचा जन्मदिन.
१९४३ : जॉन मेजर इंग्लंडचे पंतप्रधान
१९४८ : नागनाथ कोतापल्ले साहित्यिक, शिक्षणतज्ञ आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू
१९९८ : भारतीय व्यावसायीक गोल्फ खेळाडू अदिती अशोक यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५५२ : शिखांचे दुसरे गुरू गुरू अंगद देव यांचे निधन. (जन्म: ३१ मार्च १५०४)
१९६२ : करमचंद थापर, भारतीय उद्योगपती.
१९६३ : प्रसिद्ध भारतीय हिंदी साहित्यकार व राष्ट्रकवी सियारामशरण गुप्त यांचे निधन.
१९६४ : शंकर नारायण जोशी, भारतीय इतिहाससंशोधक
१९७१ : धीरेंद्रनाथ दत्ता बांगलादेशी राजकारणी (जन्म: २ नोव्हेंबर १८८६)
१९९७ : पुपुल जयकर सामाजिक कार्यकर्त्या आणि भारतीय कला व संस्कृतीच्या पुरस्कर्त्या (जन्म: ११ सप्टेंबर १९१५)

# मंत्री शिरसाट गोत्यात; ४५०० कोटींचा जमीन घोटाळा?

## निवडणुकीच्या तोंडावर शिंदेंचे मंत्री अडचणीत चौकशी समिती स्थापन

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना संजय शिरसाट हे सिडकोचे अध्यक्ष होते. त्यांनी तब्बल पाच हजार कोटीची जमीन यशवंत बिवलकर यांना नाममत्रात दिली. या व्यवहारात कोट्यवधींचा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप आमदार रोहित पवार यांनी केला होता. या प्रकरणी कोर्टात धाव घेण्यात आली होती.

दरम्यान, या कथित घोटाळ्याच्या चौकशी प्रकरणी राज्य सरकारने चौकशी समिती नेमली आहे. कोकण विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली ही समिती गठीत करण्यात आल्याने मंत्री संजय शिरसाठ यांची अडचण वाढणार असल्याची चर्चा आहे. राज्य सरकारने गठीत केलेल्या चौकशी समितीमध्ये ठाण्याचे मुख्य वन संरक्षक ठाणे जिल्हाधिकारी, सिडको सहव्यवस्थापकीय



संचालक, मुख्य भूमी आणि भूमापन अधिकारी ठाणे आणि रायगड यांचा समावेश करण्यात आला आहे. सरकारने समिती स्थापन केली असली तरी समिती स्थापन करतानाही घोळ केलेला दिसतो. ज्या अधिका-याने (लक्ष्मीकांत जाधव) आजचा जीआर काढला आहे त्याच अधिका-याने जमीन देण्याची शिफारस करणारे पत्र सिडकोला लिहिले होते. आजच्या समितीत समितीचे सचिव म्हणून जे अधिकारी आहेत त्यांनीच बिवलकर यांना जमीन अलोट केली होती. हे सर्व बघता आजची समिती म्हणजे चोरालाच पोलीस केल्यासारखे आहे असा दावा रोहित पवार यांनी ट्विट करत केला आहे.

### शिरसाटसाहेबांना सुटी नाय : रोहित पवार

केवळ समिती स्थापन करून चालणार नाही तर निवृत्त न्यायाधीशांच्या देखरेखीखाली स्वतंत्र चौकशी करणं गरजेचं आहे. शिवाय या प्रकरणाचं गांभीर्य बघता तसेच समितीची चौकशी प्रभावित होण्याची शक्यता बघता मंत्री शिरसाठ यांचा राजीनामा घेतलाच गेला पाहिजे. काहीही झालं तरी शिरसाठ साहेबांची यातून सुट्टी नाही, असे देखील रोहित पवार यांनी म्हटले आहे.

# तोतया आयएएस महिला अधिकाऱ्याचे दिल्लीत होते वास्तव्य

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

काही दिवसांपूर्वी देशाला हादरवून टाकलेल्या दिल्लीतील लाल किल्ल्याजवळील बॉम्बस्फोटादरम्यान शहरातील तोतया आयएएस महिला अधिकारी कल्पना भागवत हिचेदेखील दिल्लीत वास्तव्य असल्याचे तपासात समोर आले आहे. त्याच दरम्यान, तिच्या मोबाइलमध्ये पाकिस्तान, अफगाणिस्तान, सौदी अरेबिया व बांग्लादेशच्या व्यक्तींच्या नावे क्रमांक सेव्ह असल्याचे नव्याने समोर आले. केंद्रीय तपास यंत्रणा अधिक सतर्क झाल्याचे केंद्रीय गुप्तचर खात्यातील वरिष्ठ सूत्रांनी सांगितले.

रविवारपासून पोलिसांच्या ताब्यात असलेल्या कल्पनाची सध्या सिडको पोलिसांसह गुप्तचर यंत्रणा, एटीएसकडून कसून चौकशी सुरू आहे. बुधवारी तिच्या पोलिस कोठडीत १० दिवसांची वाढ झाली. पोलिस उपायुक्त प्रशांत स्वामी यांनी गुरुवारी सकाळी ११ ते दुपारी ४ वाजेपर्यंत तिची कसून चौकशी केली. एटीएस, गुप्तचर यंत्रणांनी दोन तास चौकशी केली. सायंकाळी पुन्हा सर्वांनी एकत्रित चौकशी करीत तिला बोलते करण्याचा प्रयत्न केला. मात्र, माझ्या खूप ओळखी आहेत, अनेक देशांत माझ्या परिचयाची माणसे, अधिकारी आहेत, असे ती सांगते. तपास यंत्रणांनी आता तिच्या प्रत्येक उत्तराची खातरजमा करणे सुरू केले आहे. पोलिस निरीक्षक



अतुल येरमे, सहायक निरीक्षक योगेश गायकवाड अधिक तपास करत आहेत. कल्पनाच्या मोबाइलमध्ये अनेक मोबाइल क्रमांकांसोबत केंद्रीय गृहमंत्र्यांचे ओएसडी म्हणून अभिषेक चौधरी नावाने नंबर सेव्ह आहेत. गेल्या दोन दिवसांपासून त्याची माहिती काढली जात होती. दिल्लीकडून प्राप्त माहितीनुसार, सदर व्यक्तीने मंत्र्यांच्या ओएसडीच्या नावाचा वापर करून त्यानेही अधिकारी असल्याचा बनाव रचल्याचा अंदाज आहे. त्यामुळे कल्पना व अशा अनेक तोतया अधिका-यांचे सिंडिकेटच ऑपरेट होत असल्याचा कयास आहे. कल्पनाच्या दाव्यानुसार, त्याची आणि तिची दिल्लीत वर्षभरापूर्वी ओळख झाली होती. तो उत्तर भारतीय असल्याचे समोर आले.

## थोडक्यात

### मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण ई-केवायसी तात्काळ करा

जालना। प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागाअंतर्गत मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेतील पात्र लाभार्थी महिलांची पडताळणी आणि प्रमाणिकरण करण्यासाठी ई-केवायसी प्रक्रिया करण्यासाठी दि.१८ नोव्हेंबर २०२५ पर्यंत मुदत देण्यात आली होती. तरी महिलांना विविध अडचणींना सामोरे जावे लागल्याने ई-केवायसी करण्यास आता दि.३१ डिसेंबर २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. तरी पात्र लाभार्थी महिलांनी पडताळणी आणि प्रमाणिकरण करण्यासाठी ई-केवायसी वेळेत करावी, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

### नगर शहरातील तीन समाजकंटक हद्दपार

अहिल्यानगर । प्रतिनिधी

अहिल्यानगर शहरात आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी कोतवाली पोलीस स्टेशनचे नवनियुक्त पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांनी सूत्रे हाती घेताच मोठी कारवाई केली.

काका ऊर्फ अब्दुलहक फकीर मोहंमद कुरेशी, रा. झेंडीगेट, अहिल्यानगर फैजान इद्रिस कुरेशी, (रा. झेंडीगेट, ता. अहिल्यानगर), म्हम्या ऊर्फ संदिप शरद शिंदे, (रा. तय्यब मशीद मागे, ता. अहिल्यानगर) भगवान चाळ (रा. भोसले आखाडा, ता. अहिल्यानगर) यांच्याविरोधात कारवाईचा प्रस्ताव तयार करण्यात आला होता. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्यामार्फत प्रस्ताव उपविभागीय अधिकारी यांच्या न्यायालयात सादर करण्यात आला. त्यावर सुनावणी होऊन मा. उपविभागीय अधिकारी, अहिल्यानगर यांनी वरील तिन्ही व्यक्तींना सहा महिन्यांकरिता जिल्हयातून हद्दपार करण्याचे आदेश दिले. सदरच्या कारवाईसाठी पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखालीपोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड, पोलीस उपनिरीक्षक गणेश देशमुख, आणि त्यांच्या पथकातील महिला पोलीस हवालदार शिल्पा कांबळे, पोलीस हवालदार विशाल दळवी, विनोद बोरगे, बाळासाहेव दौंड, वसीम पठाण, साबीर शेख, पोलीस नाईक विजय ठोंबरे, तसेच पोलीस अंमलदार सुरज कदम, सत्यम शिंदे, राम हंडाळ, दिपक रोहकले, सचिन लोळगे, रिंकु काजळे, व महिला पोलीस अंमलदार शिला ढेरे यांनी महत्वाची भूमिका बजावली.

# औंढा पंचायत समिती गैरव्यवहार प्रकरण

## दोषी असल्याच्या अहवालानंतरही गटविकास अधिकाऱ्यांना अभय

हिंगोली। प्रतिनिधी

औंढा नागनाथ पंचायत समितीमधील ५७ लाख रुपयांच्या गैरव्यवहार प्रकरणात पंचायत समितीच्या लेखा विभागातील तीन कर्मचारी निलंबित केल्यानंतर आता गटविकास अधिकाऱ्यांना मात्र वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून अभय दिले जात असल्याची चर्चा सुरु झाली आहे. विशेष म्हणजे पथकाच्या अहवालामध्ये गटविकास अधिकाऱ्यांवर ठपका ठेवण्यात आल्यानंतरही त्यांच्यावर कारवाई का होत नाही हा संशोधनाचा विषय बनला आहे. औंढा नागनाथ पंचायत समितीमध्ये लेखा विभागात कपातीच्या रकमेमध्ये ५७ लाख रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे स्पष्ट झाले होते. यामध्ये जीएसटी, विमा आदी रक्कम कपात करून वैयक्तिक बँक खात्यात




जमा केल्याचे जिल्हा परिषदेच्या चौकशीत स्पष्ट झाले होते. याबाबतचा अहवाल जिल्हा परिषदेच्या लेखा विभागाकडे सादर करण्यात आला होता. मात्र सहा महिन्याचा कालावधी लोटला तरी दोषी कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात आली नाही.

दरम्यान, जिल्हा परिषदेचे नुतन मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी लेखा विभागाच्या अहवालानंतर तीन कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई केली आहे. उशीरा का होईना तीन कर्मचाऱ्यांच्या कारवाई झाल्यामुळे गैरव्यवहार करणाऱ्यांवर वचक बसणार असल्याचे बोलले जात आहे. जिल्हा परिषदेच्या लेखा विभागाने दिलेल्या अहवालामध्ये गटविकास अधिकाऱ्यांवरही ठपका ठेवला आहे. मात्र गटविकास अधिकाऱ्यांवर अद्यापही कारवाई का झाली नाही हा संशोधनाचा विषय बनला आहे. त्यांच्यावर जिल्हा परिषदेकडून कधी कारवाई केली जाणार असा सवाल उपस्थित केला जात आहे. या संदर्भात मुख्य लेखा व वित्त अधिकारी दिगंबर माडे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी तीन कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आल्याची माहिती दिली. मात्र गटविकास अधिकाऱ्यांवर कारवाईचे अधिकार लेखा विभागाला नाहीत. त्यामुळे त्यांच्यावरील कारवाईचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला जाईल असे स्पष्ट केले.

# शहरात एकाच रात्री चार घरे फोडली

## साडेपाच लाखांचा मुद्देमाल लांबवला

जालना। प्रतिनिधी

जालना शहरातील चोरीच्या घटना पुन्हा वाढल्याचे स्पष्ट झाले आहे. निधोना रोडवरील यमुना रेसिडेन्सी परिसरात तसेच चंदनझिरा पोलिस ठाण्याजवळील एसटी कॉलनी भागात एकाच रात्री चार ठिकाणी घरफोड्या झाल्या आहेत. यात चोरट्यांनी साडेपाच लाख रुपयांचा मुद्देमाल लांबवला.

यमुना रेसिडेन्सी परिसरातील एक कुटुंब नातेवाइकांच्या अंत्यविधीसाठी बाहेर गेले असताना चोरट्यांनी संधी साधून त्यांच्या घराचे कुलूप तोडून चोरी केली. तसेच इतर तीन ठिकाणी देखील चोरी करण्यात आली. चोरी झालेला घटनास्थळाची पोलिस निरीक्षक बाळासाहेब पवार, प्रशांत देशमुख, कृष्णा तंगे आदींनी पाहणी केली.

तपास पीएसआय रवी देशमाने करीत आहेत. चोरट्यांनी कॅमेऱ्यावर टाकला कपडा : चोरी करण्याच्या अगोदर चोरट्यांनी या परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यावर कपडा टाकून चोरी केली. दरम्यान, चोरटे सीसीटीव्हीत कैद झाले आहेत. लक्ष्मण सरोदे, प्रदीप परडकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून चंदनझिरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अहिल्यानगरजवळ बिबट्या जेरबंद

## पहाटे चार वाजता तपोवन परिसरात पिंजऱ्यात सापडला

अहिल्यानगर। प्रतिनिधी

अहिल्यानगर शहराच्या जवळ तपोवन परिसरात गेल्या काही दिवसांपासून वावर असलेला बिबट्या अखेर पहाटे चार वाजता पिंजऱ्यात जेरबंद झाला. यामुळे शहरवासीयांनी सुटकेचा निःश्वास टाकला आहे. शहरालगतच्या तपोवन परिसरातील बुऱ्हानगर हद्दीत कराळे यांच्या शेतात ऊसतोड सुरू असताना, सोमवारी (२४ नोव्हेंबर) दुपारी दीडच्या सुमारास बिबट्याची तीन पिल्ले आढळून आली होती. त्यानंतर तात्पुरती ऊसतोड थांबवण्यात आली.

या घटनेची माहिती मिळताच वनक्षेत्रपाल अविनाश तेलोरे यांच्यासह वन विभागाचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल



झाले. वन विभागाने त्या ठिकाणी पिंजरा लावला आणि ड्रोनद्वारे परिसराची टेहळणी केली. दरम्यान, पिल्ले पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. वन विभागाने पिलांना सुरक्षित स्थळी स्थलांतरित केले.प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, पिलांजवळ मादी बिबट्या गुरगुरत धावून येत होती. चार दिवसांनंतर, २८ नोव्हेंबर रोजी पहाटे चारच्या सुमारास ही मादी बिबट पिंजऱ्यात अडकली. वन विभागाने प्राथमिक अंदाज व्यक्त केला आहे की, जेरबंद झालेली ही मादी याच पिलांची आई असावी. दरम्यान, अहिल्यानगर जिल्ह्यात बिबट्यांच्या हल्ल्यात मागील तीन वर्षांत १९ जणांचा मृत्यू झाला असून तब्बल १३६ जण गंभीर जखमी झाले आहेत. यात चालू वर्ष २०२५ मध्ये ११ जणांचा मृत्यू झाला आहे. नाशिक जिल्ह्यात या वर्षात बिबट्याने आठ जणांचा बळी घेतला आहे, तर विदर्भात चालू वर्षात एकाचा बळी घेतला आहे. पुणे जिल्ह्यात जुन्नरसह काही वनपरिक्षेत्रात ही बिबट्यांची संख्या वाढलेली असून बिबट्याकडून ग्रामस्थांवर हल्ले केले जात आहेत. त्यामुळे नागरिक भयभीत आहेत.

# कळमनुरी पोलिस ठाण्यात व्यक्तीचा आत्महत्येचा प्रयत्न

## शेतजमिनीच्या वादातून विषारी औषध प्राशन

हिंगोली। प्रतिनिधी

कळमनुरी पोलिस ठाण्यात तक्रारदेत असतांनाच मसोड येथील एका व्यक्तीने विषारी औषध पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केल्याची घटना गुरुवारी ता. २७ रात्री आठ वाजण्याच्या सुमारास घडली आहे. सदर व्यक्तीला तातडीने उपचारासाठी नांदेड येथे हलविण्यात आले आहे. या घटनेमुळे पोलिस दलात एकच खळबळ उडाली आहे.

याबाबत सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, कळमनुरी तालुक्यातील मसोड येथील माधव रामजी भालेराव (४५) यांचा गावातील काही जणांसोबत शेतीचा वाद आहे. या वादातून त्यांच्या नेहमीच कुरबुरी होत होत्या. त्यानंतर आज रात्रीच्या सुमारास माधव हे कळमनुरी पोलिस ठाण्यात तक्रार देण्यासाठी आले होते. यावेळी पोलिस ठाण्यात तक्रार लिहीत असतांनाच त्यांनी विषारी औषध पिऊन आत्महत्या करतो अशी धमकी देण्यास सुरवात केली. मात्र तक्रार लिहीण्याचे काम सुरु असल्याने त्यांच्या बोलण्याकडे कोणी लक्ष दिले नाही. दरम्यान, यावेळी कोणाचे लक्ष नसल्याचे पाहून माधव यांनी सोबत आणलेली विषारी औषधाची बाटली खिशातून बाहेर काढली अन थेट तोंडालाच लावली. माधव यांनी विषारी औषध पिल्याचे लक्षात येताच पोलिस निरीक्षक प्रेमकुमार माकोडे, जमादार रवी इंगोले, गजानन होळकर, कानबाराव हराळ, मिटकर, जगन पवार, दादासाहेब कांबळे यांनी तातडीने माधव यांच्या जवळील बाटली ताब्यात घेऊन त्यांना उपचारासाठी कळमनुरीच्या उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. या ठिकाणी त्यांच्यावर प्राथमिक उपचार करुन पुढील उपचारासाठी नांदेड येथे हलविण्यात आले आहे. या घटनेमुळे पोलिस दलात एकच खळबळ उडाली आहे.

**जाहिर प्रगटन**
**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय घनसावंगी**
दुरध्वनी क्रमांकः- ०२४८३-२७२१८६
E-Mail ID-tahghantigmail.com
जा.क्र.२०२५/एम ए जी /कावि-
दिनांक : ०९/०९/२०२५
श्री राहुल भिमराव नाडे रा. शिवणगांव
विरुध्द ग्रामपंचायत कार्यालय / नगर परिषद शिवणगांव ता. घनसावंगी

विषय :- कलम १३ (३) जन्म मृत्यू नोंदणी कायदा प्रमाणे जन्म मृत्यु प्रमाणपत्र मिळणे बाबत तलाठी /ग्रामसेवक मधील जाहीर प्रगटन प्रसिध्द करणे बाबत

ज्या अर्थी, अर्जदार नामे. श्री राहुल भिमराव नाडे रा. शिवणगांव ता. घनसावंगी जि. जालना येथील रहिवाशी असून अर्जदार यांनी त्यांचा मुलगा/मुलगीः राहुल भिमराव नाडे यांची त्यांनी जन्म नोंद/मृत्य नोंद ची यांची जन्म दिनांक : १३/०७/२००४ रोजी शिवणगांव येथे जन्म झाला असल्याचे अर्जात नमुद केले असून त्यां अनुषंगाने त्यांनी जन्म प्रमाणपत्र आदेश मिळणे साठी त्यांनी तहसिल कार्यलय घनसावंगी या न्यायालयात / अर्ज दाखल केलेला आहे.

त्या अर्थी, सदर जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदर जन्म नोंद बाबत कोणाचाही कोणताही आक्षेप असल्यास है जाहीर प्रगटन प्रसिध्दी झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत लेखी स्वरुपात आडोप सादर करावा जर नमूद केलेल्या कालावधीमध्ये कोणाचाही आक्षेप या कार्यालयास प्राप्त झाला नाही तर संबंधित प्रकरणात कायद्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही केली जाईल यांची नोंद घ्यावी.

आज दिनांक:- ०९/०९/२०२५ रोजी माझया सहीने व न्यायालयाचे शिक्यानिशी दिले जाते.

स्वाक्षरित
तालुका दंडाधिकारी, घनसावंगी

**जाहिर प्रगटन**
**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय घनसावंगी**
दुरध्वनी क्रमांकः- ०२४८३-२७२१८६
E-Mail ID-tahghantigmail.com
जा.क्र.२०२५/एम ए जी /कावि-१४३
दिनांक : ०९/०९/२०२५
श्री श्रीकृष्ण भिमराव नाडे रा. शिवणगांव
विरुध्द ग्रामपंचायत कार्यालय / नगर परिषद शिवणगांव ता. घनसावंगी

विषय :- कलम १३ (३) जन्म-मृत्यू नोंदणी कायदा प्रमाणे जन्म मृत्यु प्रमाणपत्र मिळणे बाबत तलाठी /ग्रामसेवक मधील जाहीर प्रगटन प्रसिध्द करणे बाबत

ज्या अर्थी, अर्जदार नामे. श्री श्रीकृष्ण भिमराव नाडे रा. शिवणगांव ता. घनसावंगी जि. जालना येथील रहिवाशी असून अर्जदार यांनी त्यांचा मुलगा/मुलगीः श्रीकृष्ण भिमराव नाडे यांची त्यांनी जन्म नोंद/मृत्य नोंद ची यांची जन्म दिनांक : ०५/०९/२००२ रोजी शिवणगांव येथे जन्म झाला असल्याचे अर्जात नमुद केले असून त्यां अनुषंगाने त्यांनी जन्म प्रमाणपत्र आदेश मिळणे साठी त्यांनी तहसिल कार्यलय घनसावंगी या न्यायालयात / अर्ज दाखल केलेला आहे.त्या अर्थी, सदर जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदर जन्म नोंद बाबत कोणाचाही कोणताही आक्षेप असल्यास है जाहीर प्रगटन प्रसिध्दी झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत लेखी स्वरुपात आडोप सादर करावा जर नमूद केलेल्या कालावधीमध्ये कोणाचाही आक्षेप या कार्यालयास प्राप्त झाला नाही तर संबंधित प्रकरणात कायद्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही केली जाईल यांची नोंद घ्यावी.

आज दिनांक:- ०९/०९/२०२५ रोजी माझया सहीने व न्यायालयाचे शिक्यानिशी दिले जाते.

स्वाक्षरित
तालुका दंडाधिकारी, घनसावंगी

# फुलंब्रीत दुसऱ्या दिवशीही चोरी, साडेचार लाखांचा ऐवज लंपास

## मंगळवारी २ लाख १७ हजार, बुधवारी २ लाखाच्या वर चोरी

फुलंब्री। प्रतिनिधी

फुलंब्री शहरामध्ये सलग दोन दिवसांपासून चोरीच्या घटना वाढल्या असून बुधवारी मध्यरात्री चोरट्याने तीन घरांमध्ये चोरी केली आहे. सोन्या, चांदीच्या दागिन्यांसह रोख रक्कम असा एकूण २ लाख १६ हजार ३७५ रुपयांचा मुद्देमाल चोरट्याने नेला. आदल्या दिवशी मंगळवारी २ लाख १७ हजार रुपयांची चोरी झाली होती. दोन दिवसांत सुमारे साडेचार लाख रुपयांची चोरी झाली आहे. याप्रकरणी फुलंब्री पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवला आहे. लाखो रुपयांच्या दागिन्यांसह रोख रक्कम चोरी गेली असून फुलंब्री पोलिसांसमोर या चोरट्यांचे आव्हान निर्माण झाले आहे.

फुलंब्री शहरामध्ये नगरपंचायत निवडणुकीची रणधुमाळी सुरू असून यात चोरट्यांचीही जणू रणधुमाळी सुरू असल्याचे चित्र फुलंब्री शहरात निर्माण झाले आहे. फुलंब्री शहरामध्ये नगरपंचायतीची निवडणूक



चालू असून चोरटे या निवडणुकीचा फायदा घेत आहेत. यामध्ये मंगळवार रोजी मध्यरात्री हरिओमनगरमध्ये घराचा कडीकोयंडा तोडून मुजीब मन्नान शेख यांच्या घरातून सोन्याच्या दागिन्यांसह रोख रक्कम असा एकूण २ लाख १७ हजार रुपयांची चोरी झाली होती. याचा तपास फुलंब्री पोलिस करत असताना बुधवारी रात्री पुन्हा फुलंब्री शहरातील तीन घरात चोरट्यांनी डल्ला मारला आहे. कडीकोंडा तोडून प्रवेश, पोलिसांत गुन्हा दाखल यामध्ये फुलंब्री शहरातील सावता माळी मंदिराजवळ राहत असलेले सचिन शेरकर यांचे वडील मयत झाले असून ते त्यांच्या मळयात राहणाऱ्या भावाकडे जेवणासाठी जात होते व तिथेच राहत होते. चोरट्यांनी त्यांच्यावर पाळत ठेवत त्यांच्या घराचा कडीकोयंडा तोडून आत प्रवेश करत सोन्या, चांदीच्या दागिन्यांसह रोख रक्कम असा एकूण २ लाख १६ हजार ३७५ रुपयांचा मुद्देमाल चोरट्याने चोरून नेला. निवडणुकीच्या धामधुमीत चोरटे घेताहेत गैरफायदा शहरामध्ये सध्या नगरपंचायतच्या निवडणुकीचे पडघम सुरू आहे. यामध्ये गेल्या तीन दिवसांपासून चोरटे या निवडणूक प्रचाराचा फायदा घेत आहेत, तर फुलंब्री पोलिस प्रशासन नेमके काय करते, यावर फुलंब्री शहरामधील नागरिक प्रश्नचिन्ह निर्माण करत आहेत. मंगळवार रोजी रात्रीच्या चोरीचा तपास लागत नाही. तोच पुन्हा बुधवारी फुलंब्रीत चोरी झाली.






# नगरपालिका निवडणुक प्रचार शिगेला

## जिल्ह्यातील सर्व पालिका निवडणुकांमध्ये तिरंगी लढती





**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यातील बीड, गेवराई, माजलगाव, अंबाजोगाई, परळी, धारूर या सहा नगरपालिकांच्या निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहोचला असून बहुतांश ठिकाणी नगरपालिकांमध्ये तिहेरी लढती होताना दिसत आहेत. तर अनेक ठिकाणी पक्षावर निवडणुका न लढवता आघाड्या करून निवडणुका लढवल्या जात आहेत. लढती तिहेरी असल्या तरी चुरस मात्र दुहेरी आहे.**

बीडमध्ये शरद पवार गटाचे उमेदवार व भाजपाच्या उमेदवारांमध्ये घड्याळाचा उमेदवार मागे पडला आहे. गेवराई मध्ये कमळ ,घड्याळ आणि तुतारीवर निवडणूक चुरशीची होत असून या ठिकाणी कमळ आणि घड्याळ या दोघांमध्ये चुरस होत आहे. माजलगाव मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट, भाजपा आणि तुतारी (आघाडी) अशी निवडणूक होत आहे. तर परळी मध्ये तिहेरी लढत होत असून या ठिकाणी भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाची युती असली तरी नगर अध्यक्षपदाचा उमेदवार मात्र घड्याळाच्या चिन्हावर निवडणूक लढवत आहे. या ठिकाणी भाजपा-राष्ट्रवादीकडून सौ.पद्मश्री धर्माधिकारी, तुतारी कडून संध्या दीपक देशमुख तर काँग्रेस ,वंचित बहुजन आघाडी आणि माकपाच्या वतीने पंजा या चिन्हावर मैमुना बेगम सय्यद या निवडणूक लढवत आहेत. या ठिकाणी भाजप आणि अजित पवार गटाची युती असल्याने नगरपालिकेमध्ये घड्याळाचे चिन्हावर सौ.पद्मश्री धर्माधिकारी या निवडणूक लढवत आहेत. पद्मश्री धर्माधिकारी यांचे पती बाजीराव धर्माधिकारी यापूर्वी नगराध्यक्ष राहिलेले आहेत तर दीपक देशमुख हे ही नगरपालिकेमध्ये नगराध्यक्ष म्हणून कार्यरत होते. त्यांच्या पत्नी सौ. संध्या देशमुख यांच्यासाठी खासदार बजरंग सोनवणे हे तळ ठोकून आहेत. तर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट आणि भाजपाच्या उमेदवारांसाठी विद्यमान मंत्री पंकजाताई मुंडे आणि माजी मंत्री धनंजय मुंडे हे तळ ठोकून गल्ली बोळात कॉर्नर बैठका घेत आहेत.आघाडीसाठी काँग्रेसचे नेते, वंचित बहुजन आघाडीचे नेते आणि माकपचे नेते गल्ली गल्लीत बैठका घेत आहेत. या ठिकाणी सर्वांसाठी निवडणूक प्रतिष्ठेची असून आजी-माजी मंत्री तळ ठोकून आहेत. धारूर नगरपालिकेमध्ये घड्याळा कडून शिरसाट, भाजपाचे निर्मळ तर शिवसेनेच्या गवळी यांच्यात निवडणूक चुरशीची होताना दिसत आहे. या ठिकाणीही तिहेरी लढत होत असून जिल्ह्यामध्ये नेत्यांनी ही निवडणूक प्रतिष्ठेची केली आहे. त्यामुळे जिल्हाभरात नेते आपापल्या उमेदवारासाठी गल्लोगल्ली फिरताना दिसत आहेत. गेवराई मध्ये भाजपाचे बाळराजे पवार आणि माजी मंत्री बदामराव पंडित हे एकत्र आल्यामुळे गेवराई शहरांमध्ये भाजपाची ताकद आणखी वाढली असून या ठिकाणी भाजपा सह अजित पवार व शरद शरद पवार गटाचे उमेदवार रिंगणात आहेत. असे असले तरी मुख्य लढत भाजप आणि अजित पवार गटाच्या उमेदवारांमध्ये होण्याची शक्यता दिसत आहे. या ठिकाणी महिला उमेदवार असल्याने भाजपाच्या गीता भाभी पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या सौ.दाभाडे यांच्यातच लढत होण्याची शक्यता आहे.

## ना.अजितदादा पवार यांची बीडमध्ये आज जाहिर सभा



बीड। प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष-शिवसेना-शिवसंग्राम-सपा व मित्रपक्ष आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या जाहिर सभेचे आयोजन बीड येथे करण्यात आले असून यावेळी बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष-शिवसेना-शिवसंग्राम-सपा व मित्रपक्षाच्या वतीने करण्यात आले आहे.

प्रचाराच्या पहिल्या टप्प्यात ना. अजितदादा पवार यांनी आपल्या जाहिर सभेत विकासाचे व्हिजन मांडल्यामुळे बीड शहरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि मित्रपक्षाच्या कार्यकर्त्यासह मतदारांमध्ये उत्साह भरला होता. प्रचाराच्या अंतिम टप्प्यात ना. अजितदादा पवार यांच्या जाहिर सभेचे आयोजन करण्यात आले आहे. बीड शहरातील बशीरगंज चौक येथे आज सायं. ५.३० वाजता होणाऱ्या या सभेची जय्यत तयारी करण्यात आली असून या सभेने राष्ट्रवादी काँग्रेस व मित्रपक्षाच्या नगराध्यक्ष पदासह सर्व ५२ नगरसेवक पदाच्या उमेदवारांच्या विजयावर शिक्का मोर्तब होणार आहे. उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजितदादा ◀◀ पान ३ वर

## तपेनिमगाव येथे दहा क्विंटल कापूस चोरीस, दोघांवर गुन्हा

तलवाडा प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तपेनिमगाव शिवारात पत्र्याच्या शेडमध्ये ठेवलेला शेतकऱ्याचा ६० हजार रुपये किमतीचा दाहा कुठलं कापूस चोरी केल्याप्रकरणी तलवाडा पोलिस ठाण्यात शेतकऱ्याच्या तक्रारीवरून दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तपेनिमगाव येथील जयसिंग काळे या शेतकऱ्याच्या गट नंबर ३१ मध्ये दीड एकर शेती असून २१ नोव्हेंबर रोजी त्यांनी शेतातून कापूस वेचून पत्र्याच्या शेडमध्ये ६० हजारांचा दाहा कुठलं कापूस आणून ठेवला होता. घरातील लोक जालना जिल्ह्यातील परतूर जिल्ह्यातील आष्टी येथे गेले होते.

दरम्यान २५ नोव्हेंबर रोजी दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास कुटूंबातील लोक घरी आले असता त्यांना घरात ठेवलेला कापूस कोणीतरी चोरून नेल्याचे त्यांना दिसून आले. सदरील कापूस चोरी प्रकरणी त्यांनी आजूबाजूला चौकशी केली असता डिस्टीबन माधुरा तपेनिमगाव, छुन प्रकास भोसले रा. पिपळा ता. आष्टा जि. बीड हे तेथे आले होते. त्या दोघांनीच कापूस चोरी केली असल्याचे काही लोकांनी सांगीतले, त्यामुळे याप्रकरणी ◀◀ पान ३ वर

## खाजगी वाहनावर पोलीस विभागाचे चिन्ह अथवा पाटी लावण्यास सक्त मनाई

### सूचनांचे पालन न झाल्यास कायदेशीर कारवाई करण्याचे राज्यपालांचे आदेश

बीड । प्रतिनिधी

पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या खाजगी मालकीच्या वाहनावर पोलीस विभागाचे चिन्ह किंवा पोलिस अशी पाटी लावण्यास सक्त मनाई करण्यात आली असून या सूचनांचे पालन न झाल्यास कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश राज्यपालांच्या वतीने गृह विभागाचे कक्ष अधिकारी विजय साबळे यांनी पोलीस प्रमुखांना दिले आहेत.

गेल्या काही दिवसापासून पोलीस अधिकारी आणी कर्मचारी बिंधास्तपणे आपल्या खाजगी वाहनावर पोलीस विभागाचे चिन्ह किंवा पोलिस अशी पाटी लावतात. ही पाटी लावण्यास कायद्यानुसार मनाई आहे. पोलिस विभागाचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या खाजगी वाहनावर पोलीस विभागाचे चिन्ह अथवा पोलिस अशा पाट्या असल्याच्या अनेक तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत. ही कृती बेकायदेशीर असून पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी स्वतःच्या खाजगी वाहनावर मग ते चार चाकी असो किंवा दुचाकी पोलीस विभागाचे चिन्ह किंवा पोलिस अशी पाटी लावू नये अशा सक्त सूचना सर्व अधिकारी आणी कर्मचाऱ्यांना देण्यात याव्यात. सदर सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे असे या सूचनांचे पालन न झाल्यास संबंधित अधिकारी आणी कर्मचाऱ्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशा सक्त सूचना महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार गृह विभागाचे कक्ष अधिकारी विजय साबळे यांनी पोलीस प्रमुखांना दिले आहेत.

## भगवानआप्पा हालगे यांचे निधन

परळी । प्रतिनिधी

परळी शहरातील गणेशपार भागातील जेष्ठ नागरिक,राशन दुकानदार असलेले भगवानअप्पा संबाप्पा हालगे यांचे गुरुवार दि.२७ नोव्हेंबर रोजी रात्री ११.२० वाजता रहात्या घरी निधन झाले.त्यांच्या पार्थिवावर दि.२८ रोजी परळी येथील वीरशैव लिंगायत स्मशानभुमीत अंत्यविधी करण्यात आले.



गणेशपार भागातील जेष्ठ नागरीक असलेले भगवानअप्पा हालगे हे जुन्या काळापासुन राशन दुकानदार म्हणुन ओळखले जात होते.गत काही महिन्यांपासून ते आजारी होते.यातच गुरुवार दि.२७ नोव्हेंबर रोजी रात्री ११.२० वाजता निधन झाले.मृत्युसमयी त्यांचे वय ७५ वर्षे होते.त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले,दोन मुली,सुना,नातवंडे असा परिवार असुन त्यांच्या पार्थिवावर शुक्रवार दि.२८ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजता अंत्यविधी करण्यात आले.

## नरेगा वर्ककोड डिलीट; लाभार्थ्यांसाठी तातडीने उपाययोजनांची मागणी

बीड । प्रतिनिधी

नरेगा योजनेअंतर्गत राजुरी नवगण व कामखेडा गणातील सर्व प्रकारच्या कामांचे वर्क कोड डिलीट झाल्याने लाभार्थ्यांपुढे मोठे संकट निर्माण झाले आहे. अनेक गावांमध्ये कामे थांबली असून मजुरांना रोजगार मिळण्यात अडचणी येत आहेत. या गंभीर प्रश्नी तातडीने कार्यवाही करून निलंबित कामे सुरू करणे व मस्टर तात्काळ चालू करण्याची मागणी करण्यात आली आहे. यासाठीचे निवेदन वरिष्ठ अधिकाऱ्यांना सादर करण्यात आले.

शिवसेना जिल्हाप्रमुख श्री. अनिलदादा जगताप साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. सतीश शेळके पाटील यांच्या वतीने मा.ना. श्री. एकनाथरावजी शिंदे साहेब, उपमुख्यमंत्री, मा.ना. श्री. भरतशेठजी



गोगावले साहेब, मंत्री रोजगार हमी योजना यांनी मा. आयुक्त साहेब, नरेगा विभाग, नागपूर, मा. जिल्हाधिकारी साहेब, बीड, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब, जि.प. बीड, मा. उपजिल्हाधिकारी साहेब (रोहयो), बीड, मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी साहेब (पंचायत), जि.प. बीड सत्वर कार्यवाहीसाठी ◀◀ पान ३ वर

## महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ सौ. राजश्रीताई धनंजय मुंडे मैदानात

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

नगरपरिषद निवडणुकीत आज सकाळपासूनच सौ. राजश्रीताई धनंजय मुंडे यांनी महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ विविध भागात प्रचार दौरा केला. या प्रचार दौऱ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद देत नागरिकांनी विशेषतः महिलांनी त्यांचे आत्मीय स्वागत करत वहिनी महायुतीच विजय होणार अशी खात्रीच राजश्रीवहिनी यांना दिली.आमच्यावर परळीकर जनतेचे प्रचंड प्रेम असून या प्रेमाला उतराई होण्यासाठी केवळ विकास आणि विकासच करू असा शब्द सौ.



राजश्रीताई मुंडे यांनी यावेळी ठिकठिकाणी बोलताना दिला.

राष्ट्रवादी काँग्रेस व महायुतीच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी व परळी शहरातील विविध प्रभागात महायुतीच्या वतीने अधिकृत उमेदवारी देण्यात आलेल्या सर्व उमेदवारांच्या प्रचारासाठी सौ. राजश्रीताई धनंजय मुंडे या स्वतः मैदानात उतरल्या असून आज पासून त्यांनी आपल्या प्रचार व जनसंपर्क दौऱ्याला सुरुवात केली. यामुळे परळीत प्रचंड चैतन्य निर्माण झाले आहे. ◀◀ पान ३ वर

## न्याय मिळाल्याशिवाय मागे हटणार नाही - डॉ. गोऱ्हे

### डॉ.गौरी पालवे आत्महत्या प्रकरणी, उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी कुटुंबीयांची घेतली भेट

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील पिंपळनेर येथे आज विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी स्व. डॉ. गौरी पालवे-गर्जे यांच्या आई-वडिलांची भेट घेऊन त्यांच्या मनातील प्रश्न, वेदना आणि न्यायाबाबतच्या अपेक्षा जाणून घेतल्या. भेटीनंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

डॉ. गोऱ्हे म्हणाल्या की, गौरी पालवे-गर्जे यांचा मुंबईतील मृत्यू अत्यंत दुर्दैवी आहे. तिच्या कुटुंबाने काही महत्त्वाची अतिरिक्त माहिती पोलिसांना द्यायची इच्छा



व्यक्त केली; परंतु त्यांची नोंद झाली नव्हती. या तक्रारीची मी तत्काळ दखल घेऊन मुंबई पोलिसांशी तसेच स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांशी बोलले असून, पुढील दोन-तीन दिवसांत अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत त्यांच्या सर्व पुरवणी जबाबांची नोंद केली जाणार आहे. कुटुंबीयांनी आरोपीचे भाऊ अजय गर्जे आणि बहीण शीतल आंधळे यांनाही अटक करावी, अशी मागणी केली असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. गौरीवर पूर्वी अनेकदा मारहाण झाल्याचे त्यांनी सांगितल्याने या प्रकरणाचे मूळ कारण नीट समजून घेणे अत्यावश्यक असल्याचेही डॉ. गोऱ्हे यांनी नमूद केले.

उपसभापती म्हणून जबाबदारी आहेच, पण आई म्हणूनही हे प्रकरण मन हेलावून टाकणारं आहे. कुटुंबीयांना सक्षम सरकारी वकील मिळावा म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि पोलीस महासंचालक ◀◀ पान ३ वर

## जिल्ह्याबाहेरही ऊस आंदोलनाची व्याप्ती वाढली

### शेकडो शेतकऱ्यांचा फौजफाटा विविध कारखान्यावर धडकला

परळी । प्रतिनिधी

ऊस उत्पादक संयुक्त कृती समितीने पुकारलेल्या कोयता बंद, वाहतूक बंद आंदोलन करत असून या आंदोलनाची व्याप्ती जिल्ह्याबाहेर पोहचली असून ऊसाचा ग्रीन बेल्ट असलेल्या परभणी जिल्ह्यातील सोनपेठ तालुक्यातील असंख्य गावातील शेतकरी यांनी समितीला पाठींबा देत शेतकऱ्यांनी आपली ऊस तोड व ऊस वाहतूक थांबवली आहे. यातच ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने समितीत सामील होऊल पेक्षा अधिक



वाहनाद्वारे जिल्ह्यातील सर्वच साखर कारखानदारांना भेटी देत आपल्या मागण्याचे निवेदन दिले.

ऊस उत्पादक शेतकरी, साखर कारखानदार यांच्याशी जिल्हाधिकाऱ्यांच्या मध्यस्थीने झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत कारखानदारांनी कोणतीही सकारात्मक भूमिका न घेतल्यामुळे ही चर्चा निष्फळ ठरली. ऊस दर बाबत कोणताही निष्कर्ष निघाला नसल्याने ऊस आंदोलन चिघळले आहे. जिल्ह्यातील ऊस तोड, ऊस वाहतूक ठप्प झाली असून काही साखर कारखाने बंद तर उर्वरित येत्या काही दिवसात ऊसाची आवक नसल्याने बंद होण्याच्या मार्गावर आहेत. अशातच शुक्रवार दि २८ रोजी शेकडो ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी वाहनांच्या ताफ्याद्वारे जिल्ह्यातील ओंकार शुगर्स पांगरी, अंबा साखर अंबाजोगाई, येडेश्वरी शुगर्स केज, गंगा माऊली शुगर्स केज या ठिकाणी ल शेतकरी समितीने भेटी देऊन सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात केंद्र सरकारने ऊसासाठी प्रत्येक टनासाठी ३५५५ रु. दर १०.२५ रिकव्हरीला जाहीर केला आहे. आपणाकडे ११ किंवा त्यापेक्षा ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# जेजुरी शहर स्मार्ट सिटी करणार - अजित पवार

पुणे । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस हा केंद्र व राज्य सरकारमध्ये सत्तेत आहे. त्यामुळे केंद्र सरकारच्या माध्यमातून जेजुरी शहरासाठी निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केला जाईल. पालखी महामार्ग, रस्ते, पाणीपुरवठा, शहर सुशोभीकरण, बागबगीचा पार्किंग, आदी कामे पूर्ण केली जातील. पर्वत योजनेत रोप वेचा समावेश करून जेजुरीत उभारणार आहे. जेजुरी शहर हे स्मार्ट सिटी करणार आहे. जेजुरी शहरातील सोयी- सुविधा शाश्वत विकास करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे पक्षाच्या उमेदवारांना साथ द्यावी, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.



जेजुरी नगरपालिकेच्या पंचवार्षिक निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ जाहीर सभेचे आयोजन जेजुरी शहरात करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी सभेसाठी मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांबरोबर मतदारांनी गर्दी केली होती. महिलांची उपस्थिती लक्षणीय होती.नगराध्यक्ष पदासाठी जयदीप बारभाईं यांना देवस्थान माजी विश्वस्त संदीप जगताप, संतोष खोमणे, माजी नगराध्यक्ष गणेश निकुडे, रोहिदास कुंभार, शहराध्यक्ष रमेश लेंडे यांनी पाठिंबा देत जेजुरी नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे पक्षाच्या वतीने उमेदवारी विविध अठरापगड जाती धर्माचे लोक यांना देत सर्व समाज बांधवांना न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. उमेदवारी देताना अनुभव, पक्षाची ध्येय धोरणे, जेजुरीच्या सर्वांगीण विकासासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे पक्षाच्या कार्यकर्त्यांनी चांगले काम करावे.पवार म्हणाले की, शब्दाला पक्का आहे, जे बोलतो ते करतो. लबाडी, खोटारडेपणा करत नाही. एखादे काम होणार नसेल तर स्पष्ट सांगतो. आम्ही सर्व शैक्षणिक, आर्थिक, सहकारी संस्था चांगल्या प्रकारे चालवितो. उद्योजक कंपन्यांकडून सीएसआर फंड उपलब्ध करून देण्यात येईल. पाणीपुरवठा योजना मंजूर करून दिली. परंतु अजूनही अपूर्ण आहे. जेजुरीला कचराकुंडी मुक्त करण्यासाठी बायोमायनिंग प्रकल्प राबविण्यात येईल. भव्य वाहनतळाची सुविधा उभारणार आहे. जेजुरी नगरपरिषद भ्रष्टाचारमुक्त आणि भयमुक्त करणार आहे. जेजुरीत येऊन कोणी दमदाटी केली तर खपवून घेणार नाही जसास तसे उत्तर देणार आहे, असा इशारा त्यांनी यावेळी दिला.

यावेळी नगराध्यक्ष पदाचे उमेदवार जयदीप बारभाईं यांनी जेजुरी नगरपरिषदेतील भ्रष्टाचारमुक्त करण्यासाठी मतदारांनी साथ द्यावी. शहरातील सोयी- सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी मतदारांना साद घातली. यावेळी जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष डॉ. दिगंबर दुर्गाडे, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष जालिंदर कामथे, तालुकाध्यक्ष उत्तम धुमाळ, जेजुरीचे ज्येष्ठ नेते, माजी नगराध्यक्ष दिलीप बारभाई, माजी सनदी अधिकारी संभाजीराव झेंडे, पदाधिकारी, राष्ट्रवादीचे उमेदवार उपस्थित होते.

पवार म्हणाले की, सोन्याची जेजुरी करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केला जाईल. जेजुरीत कोणी सांगायला येताना प्रत्येकाने लक्षात ठेवावे की, आपले शहर कसे आहे. कोणत्या सुविधा दिल्या आहेत. हे पहावे. मग सांगितले पाहिजे. मी बारामतीत सुविधा देतो, तशा सुविधा दिल्या पाहिजेत. काही वर्षांत प्रचंड विकसित होणारा हा पुरंदर तालुका आहे. पुरंदर विमानतळामुळे तालुक्याचा विकास होणार आहे. त्यामुळे नागरिकांचे जीवनमान उंचावले जाईल. मतदारांनी जात पात धर्म यांचा विचार न करता सर्वांनी राष्ट्रवादीच्या उमेदवारांना साथ द्यावी. मी अल्पसंख्यांक समाजाला प्रतिनिधीत्व दिले आहे. जेजुरीच्या पाण्यासाठी वणवण भटकंती थांबविली जाईल, अशी ग्वाही त्यांनी जेजुरीकरांना दिली.

पवार म्हणाले, भ्रष्टाचार झाल्यावर विकास कसा होणार, असा सवाल करीत त्यांनी सत्ताधारी गटाचे चिमटे काढले. जेजुरीत कोणी येऊन काय सांगितले तर ऐकू नका. राष्ट्रवादीच्या सर्व उमेदवारांना निवडून द्यावे. मी जेजुरीतूनच बारामतीला जातो. त्यामुळे जेजुरीत थांबल्याशिवाय जाणार नाही. त्यामुळे मी शब्द देतो. माझ्या लाडक्या बहीणी आणि सर्व उमेदवारांना निवडून द्यावे. जे निवडणुकीसाठी थांबले. त्यांना स्वीकृत नगरसेवक करणार आहे.

# मोबाइलच्या स्क्रीनवरून मैदानावर!

## पुण्यातल्या ४४ हजार खेळाडूंना अक्षय कुमारचा फिटनेस मंत्र

पुणे । प्रतिनिधी

लहान मुले हल्ली मोबाइल गेममध्ये रमली आहेत. त्यामुळे मैदानात येणाऱ्यांची संख्या कमी झाली आहे. अशा परिस्थितीत पुण्यातून तब्बल ४४ हजार खेळाडू मैदानात उतरत आहेत, ही मोठी गोष्ट आहे. खेळातूनच आरोग्य घडते आणि आरोग्य हीच यशाची गुरुकिल्ली आहे, असे प्रतिपादन अभिनेता अक्षय कुमारने केले. पुण्याचे खासदार आणि केंद्रीय सहकार व नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी क्रीडेला दिलेल्या चालनेबद्दल त्यांनी अभिनंदनही केले.



खासदार क्रीडा महोत्सवाचा समारोप गुरुवारी गणेश कला क्रीडा रंगमंच येथे झाला. मोहोळ यांनी भारतमातेची प्रतिमा देऊन अक्षय कुमारचा सत्कार केला. महोत्सवातील विजेत्या चार हजार खेळाडूंचा या प्रसंगी गौरव करण्यात आला. अक्षय कुमार यांनी लहान खेळाडूंशी संवाद साधला. अक्षय कुमार आणि मोहोळ सायकल चालवत व्यासपीठाजवळ आले, यावेळी वातावरणात चांगलाच जल्लोष रंगला होता.कार्यक्रमाला उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत कार्यवाह डॉ. प्रवीण दबडघाव, खेलरत्न पुरस्कार विजेती आंतरराष्ट्रीय नेमबाज अंजली भागवत, मुख्य समन्वयक मनोज एरंडे, ऑलिम्पियन रेखा भिडे, माजी कबड्डीपटू शांताराम जाधव, ऑलिम्पियन बॉक्सर मनोज पिंगळे, तेनसिंग नोर्गे पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ गिर्यारोहक उमेश झिरपे, माजी कबड्डीपटू शकुंतला खटावकर, ध्यानचंद पुरस्कारप्राप्त टेनिसपटू नितीन कीर्तने,माजी क्रिकेटपटू केदार जाधव, सुरेखा द्रविड, श्रीरंग इनामदार तसेच प्रकाश जावडेकर, धीरज घाटे, खासदार मेधा कुलकर्णी, आमदार भीमराव तापकीर, सुनील कांबळे, सिद्धार्थ शिरोळे, हेमंत रासने, राजेश पांडे, सचिन भोसले उपस्थित होते.मुरलीधर मोहोळ म्हणाले, विकसित भारत बलवान असला पाहिजे. फिट इंडिया आणि क्रीडा महोत्सवांचे उपक्रम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केले. त्याचाच एक भाग म्हणून ३७ क्रीडा प्रकारांत २९ ठिकाणी स्पर्धा घेतल्या. पुण्याची क्रीडा परंपरा वैभवशाली आहे; ती अधिक समृद्ध करणे हा मुख्य उद्देश आहे. तर यावेळी उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील डॉ. प्रवीण दबडघाव, अंजली भागवत यांनीसुद्धा मनोगत व्यक्त केले.

# २ डिसेंबरला सुट्टी जाहीर; पुणे जिल्ह्याधिकाऱ्यांची घोषणा

पुणे । प्रतिनिधी

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील नगरपरिषदा आणि नगरपंचायतीसाठी २ डिसेंबर रोजी मतदान तर ३ डिसेंबर रोजी निकालाची घोषणा होणार आहे. नगरपरिषद व नगरपचांयतीच्या सार्वत्रिक निवडणुकीत पात्र मतदारांना मतदान करता यावे, याकरिता २ डिसेंबर २०२५ रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे, अशी माहिती पुणे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली आहे.



पुणे जिल्ह्यातील आळंदी, बारामती, भोर, चाकण, दौंड, फुरसुंगी-उरळी देवाची, इंदापूर, जेजुरी, जुन्नर, लोणावळा, माळेगाव बुद्रुक, मंचर, राजगुरुनगर, सासवड, शिरूर, तळेगाव दाभाडे व वडगाव मतदारसंघांत सुट्टी राहणार आहे. केंद्र व निमशासकीय कार्यालये, बँका यांनाही सुट्टी लागू असून पात्र मतदारांनी मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे. मतदार संघाच्या क्षेत्रातील जे मतदार कामाकरिता त्या त्या मतदारसंघाच्या बाहेर असणाऱ्यांना मतदारांना देखील लागू राहणार असल्याचे देखील सांगण्यात आले आहे.

# भरधाव ट्रकने उडवल्या एकापाठोपाठ ९ गाड्या

थेऊर । प्रतिनिधी

येथील थेऊर - कोलवडी रस्त्यावर ट्रकने ९ दुचाकींना धडक दिल्याने दुचाकीचा चक्काचूर झाला आहे. ही घटना थेऊर (ता. हवेली) येथील स्मशानभूमीजवळ बुधवारी (दि. २६ ) रात्री दहा वाजण्याच्या सुमारास घडल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झालेली नाही. याबाबत लोणी काळभोर पोलीस ठाण्यात ट्रक चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



श्रीराम संतराम वरपे (वय २५, रा. कोरडेवाडी, पोस्ट विदा, जिल्हा बिड) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या ट्रकचालकाचे नाव आहे. याप्रकरणी अजय मनोहर पवार (वय ३३, रा. पाण्याच्या टाकी शेजारी थेऊर ता. हवेली जि. पुणे) यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी अजय पवार हे थेऊर येथील एका व्यक्तीच्या अंत्यसंस्कारासाठी गेले होते.

पवार यांनी थेऊर स्मशानभुमीच्या बाहेर थेऊर ते कोलवडी रस्त्याच्या कडेला दुचाकी पार्क केली होती. तसेच गावातील इतर नागरीकांनीही त्या ठिकाणी मोटार सायकली पार्क केल्या होत्या. तेवढ्यात स्मशान भूमीच्या बाहेर रोडवर जोरात गाड्या धडकल्याचा आवाज आला. त्यावेळी सर्वजण पळत स्मशानभुमीच्या बाहेर आले. तेव्हा कोलवडीकडून थेऊरकडे जाणाऱ्या मोठ्या ट्रकने दुचाकींना जोराची धडक दिली होती. दरम्यान, या अपघातात विजय पवार, विकास आण्णासो व्यवहारे व इतर ५ ते ६ जणांच्या मोटार सायकलींचा चक्काचूर झाला होता. ट्रकचालक श्रीराम वरपे याने त्याच्या ताब्यातील ट्रक हा वाहतुकीच्या नियमाकडे दुर्लक्ष करुन, ट्रक भरधाव वेगाने चालवून तसेच इतरांच्या जीवीतास धोका निर्माण होईल अशा रितीने वाहन चालवून ९ मोटार सायकलींना धडक देऊन या अपघातास व वाहनांच्या नुकसाणीस कारणीभूत ठरला आहे.लोणी काळभोर पोलीस ठाण्यात ट्रकचालक श्रीराम वरपे याच्यावर भारतीय न्याय संहिता २८१,३२४ (४),३२४ (५) व मोटार वाहन अधिनियम १८४,११९ व १७७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार बारगजे करीत आहेत.



पुणे ।गेली पंधरा वर्षापासून परिचित मित्रवर्य पुणे इन्कम टॅक्स कमिशनर विश्वासराव मुंडे साहेब यांच्या पत्नी राज्याच्या समाज कल्याण आयुक्त वरिष्ठ आय ए एस अधिकारी दीपा मुंडे मुधोळ यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना पत्रकार गोविंद घोळवे

# शिक्षणाचे प्रणेते,क्रांतिसूर्यमहात्मा फुले थोर समाजसुधारक - आयुक्त श्रावण हर्डीकर

**पिंपरी । प्रतिनिधी**

स्त्री शिक्षणाचे प्रणेते, थोर समाजसुधारक महात्मा जोतीराव फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने मुख्य प्रशासकीय इमारतीमधील महात्मा जोतीराव फुले यांच्या प्रतिमेस आयुक्त तथा प्रशासक श्रावण हर्डीकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले.



या कार्यक्रमास राज्य अनुसूचित जाती जमातीचे आयोगाचे सदस्य ड. गोरक्ष लोखंडे, सह शहर अभियंता बापू गायकवाड,उपायुक्त अण्णा बोदडे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह महानगरपालिकेच्या विविध विभागातील कर्मचारी उपस्थित होते. तसेच पिंपरी येथील ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले स्मारक येथील महात्मा जोतीराव फुले यांच्या पुतळ्यास राज्य अनुसूचित जाती जमातीचे आयोगाचे सदस्य ड. गोरक्ष लोखंडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले,या कार्यक्रमास उपायुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक,पोलीस प्रशासनाचे राजेंद्र शिंदे,सामाजिक कार्यकर्ते शंकर लोंढे, यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

# हिंजवडीत धक्कादायक प्रकार! १५ बालकांना वर्गात कोंडून अंगणवाडी मदतनीस बैठकीला; दोषींवर कारवाईचे आदेश

पुणे । प्रतिनिधी

हिंजवडीसारख्या आयटी पार्कमध्ये धक्कादायक आणि संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे. हिंजवडी ग्रामपंचायत हद्दीतील अंगणवाडी क्रमांक ३ मध्ये ३ ते ६ वर्षे वयोगटातील तब्बल १५ चिमुकल्यांना वर्गातच कोंडून आणि बाहेरून सेफ्टी दरवाजाला कुलूप लावून मदतनीस चक्क माजी सरपंचांच्या बैठकीला हजेरी लावण्यासाठी गेल्याची घटना घडली आहे. ही बाब जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांच्या चौकशीतून समोर आली.

दरम्यान, या घटनेचा व्हिडीओ समाजमाध्यमांवर पसरल्यानंतर प्रशासन खडबडून जागे झाले आहे.दि. २६ नोव्हेंबर रोजी हिंजवडी ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या अंगणवाडी क्रमांक ३ मध्ये हा प्रकार घडला. हिंजवडीचे माजी सरपंच शिवनाथ जांभूळकर यांनी अंगणवाडी कर्मचाऱ्यांची बैठक बोलावली होती. त्यानुसार पर्यवेक्षिका संध्या विश्वासराव यांनी केवळ अंगणवाडी सेविकांना बैठकीसाठी पाठवले होते.





मात्र, माजी सरपंचांनी सेविकांसोबत मदतनिसांनाही तत्काळ बैठकीला बोलावून घेण्याचे सांगितले. त्याप्रमाणे अंगणवाडी क्रमांक ३ च्या मदतनीस शिल्पा साखरे यांनी बालकांच्या सुरक्षेचा कोणताही विचार न करता उपस्थित १५ बालकांना अंगणवाडीतच ठेवले. धक्कादायक बाब म्हणजे, त्यांनी बाहेरून सेफ्टी दरवाजाला चक्क कुलूप लावले आणि तेथे उपस्थित असलेल्या तीन पालकांना लक्ष देण्यास सांगून ग्रामपंचायतीमध्ये चाललेल्या बैठकीला निघून गेल्या. जरी हे अंतर १०० मीटर असले तरी, १० मिनिटे बालके आतमध्ये कोणत्याही देखरेखीविना कुलूपबंद अवस्थेत होती, अशी माहिती जिल्हा परिषदेने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे दिली.

दरवाजा बाहेरून बंद झाल्याने आणि आतमध्ये कोणीच नसल्याने भेदरलेल्या चिमुकल्यांनी एकच टाहो फोडला. बालकांच्या रडण्याचा आवाज ऐकून परिसरातील नागरिक आणि पालक धावत आले. यावेळी उपस्थित पालक उज्वला गांगुर्डे यांनी प्रसंगावधान राखत तत्काळ बाल विकास प्रकल्प अधिकारी धनराज गिराम यांना फोन करून या गंभीर प्रकाराची माहिती दिली. त्यानंतर गिराम यांनी मदतनीस साखरे यांना तातडीने बैठक सोडून अंगणवाडीत जाण्याचे आदेश दिले. दरम्यान, या घटनेचे गांभीर्य लक्षात घेता गुरुवारी विस्तार अधिकारी सुनील शेटे आणि पर्यवेक्षिका संध्या विश्वासराव यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन चौकशी केली. या प्रकरणाची गंभीर दखल जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी घेतली आहे. त्यांनी याबाबतचा सविस्तर अहवाल महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद कार्यालयास सादर करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच या प्रकरणात दोषींवर कडक कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

# विद्यार्थ्यांसोबत भिंती रंगवण्याचा हा क्षण खरोखरच खास - अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर

## पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विद्यार्थ्यांनी आपल्या संकल्पनेतून जिल्हा प्रशिक्षण व अध्ययन संस्थेच्या भिंती रंगवल्या

पिंपरी । प्रतिनिधी

पिंपरी चिंचवड महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांसोबत रंगकाम करण्याचा अनुभव म्हणजे जणू पुन्हा शाळेच्या दिवसांत परत गेल्यासारखे वाटले. मुलांचा उत्साह, त्यांची निरागस कल्पनाशक्ती पाहताना माझ्याही शाळेच्या आठवणी जाग्या झाल्या. इतक्या मनापासून काम करणाऱ्या विद्यार्थ्यांसोबत भिंती रंगवण्याचा हा क्षण खरोखरच खास आणि स्मरणीय ठरला असे मत अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी केले. पिंपरी चिंचवड महानगरपालिका व जिल्हा प्रशिक्षण व अध्ययन संस्था (ऊखएढ) यांच्या संयुक्त विद्यमाने भवानीपेठ येथे विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या भित्तीचित्र सादरीकरण झाले. या भित्तीचित्र पाहणी दरम्यान अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर बोलत होत्या.

यावेळी शिक्षण विभागाचे प्रमुख डॉ. प्रभाकर क्षीरसागर, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे उपसंचालक अरुण जाधव, तसेच जिल्हा प्रशिक्षण आणि अध्ययन संस्थेचे प्राचार्य नामदेव शेंडकर, प्रशासन अधिकारी संगीता बांगर, कला नोडल अधिकारी श्रीकांत चौगुले यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाच्या वतीने जिल्हा प्रशिक्षण व अध्ययन संस्था (ऊखएढ), भवानीपेठ येथे 'निपुण भारत' या विषयावर विद्यार्थ्यांनी जिल्हा प्रशिक्षण व अध्ययन संस्थेच्या भिंतीवर चित्र रेखाटले . फिट इंडिया - हिट इंडिया, निपुण भारत, साक्षर भारत - सक्षम भारत अशा विविध राष्ट्रीय संकल्पनांवर आधारित १८ विद्यार्थ्यांच्या एकूण १८ कलाकृती संस्थेच्या भिंतींवर रेखाटण्यात आल्या. महापालिकेच्या विद्यार्थ्यांनी आणि कला शिक्षकांनी मिळून ही संपूर्ण भित्तीचित्रे साकारली असून कार्यालयीन परिसर अधिक प्रेरणादायी आणि शैक्षणिक बनला आहे. या उपक्रमासोबतच महापालिकेच्या शाळांमधील कला शिक्षकांसाठी विशेष कार्यशाळेचेही आयोजन करण्यात आले. सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात शाळांमध्ये उच्च दर्जाचे कला शिक्षण राबवण्यासाठी प्राथमिक शिक्षण विभागामार्फत मानधन कला शिक्षकांना आधुनिक कला तंत्र, भित्तीचित्र रचना, रंगांचा वापर आणि सर्जनशील अध्यापन पद्धती याबाबत विशेष प्रशिक्षण देण्यात आले.शहरी शाळांमध्ये कला-विकासाला चालना मिळावी, विद्यार्थ्यांची सृजनशीलता वाढावी त्यांच्या कलागुंणाना वाव मिळावा हा या संपूर्ण कार्यक्रमाचा प्रमुख हेतू होता. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाचा हा उपक्रम भविष्यातील शैक्षणिक दर्जा आणि विद्यार्थ्यांच्या कलात्मक क्षमतेत मोठी भर घालणारा ठरणार आहे.



निपुण भारतासारख्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला नवी दिशा मिळते. कला ही विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाची महत्त्वाची कडी आहे. महापालिकेच्या शाळांतील विद्यार्थ्यांनी साकारलेली ही भित्तिचित्रे त्यांच्या कल्पकता उदाहरण आहे.

- तृप्ती सांडभोर अतिरिक्त आयुक्त, पिंपरी- चिंचवड महानगरपालिका

शिक्षणात कलाशिक्षणाचा समतोल साधणे अत्यंत आवश्यक आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थी आणि कला शिक्षकांना प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याची संधी मिळाली. भविष्यात असे अनेक उपक्रम सातत्याने राबवून आम्ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील राहू.

- संगीता बांगर, प्रशासन अधिकारी शिक्षण विभाग पिंपरी चिंचवड महानगरपालिका